
लोकप्रिय,लोकनेते
महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री
आमदार मा.श्री.अब्दुल सत्तार साहेब
यांना वाढदिवसाच्या
हार्दीक शुभेच्छा..!
* शुभेच्छुक *
लोकनेते आमदार मा.श्री.अब्दुल सत्तार साहेब मित्र मंडळ,सोयगांव -सिल्लोड

मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : ११५ ■ शुक्रवार, ०२ जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




## केंद्रप्रमुख संघाच्या राज्य नेतेपदी बाबाजी शिर्के यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**आष्टी प्रतिनिधी : बाळासाहेब रकटाटे :** महाराष्ट्र राज्य केंद्रप्रमुख संघ महाराष्ट्र ही श्रमिक संघ अधिनियम १९२६ अंतर्गत स्थापन झालेली नोंदणीकृत संघटना असून, संघाच्या राज्य नेतेपदी बाबाजी शिर्के यांची निवड करण्यात आली आहे. ही निवड संघटनेचे राज्याध्यक्ष अशोकराव महाले यांनी केली आहे.बाबाजी शिर्के हे यापूर्वी महाराष्ट्र राज्य केंद्रप्रमुख संघ महाराष्ट्र या संघटनेचे जिल्हाध्यक्ष म्हणून कार्यरत होते. काही महिन्यांपूर्वी ते सेवानिवृत्त झाले असले तरी, त्यांचा प्रदीर्घ अनुभव, संघटन कौशल्य व केंद्रप्रमुखांच्या प्रश्नांबाबतची ठाम भूमिका लक्षात घेऊन १ जानेवारीपासून त्यांची राज्य नेतेपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



राज्याध्यक्ष अशोकराव महाले यांच्यासोबत बाबाजी शिर्के यांनी केंद्रप्रमुखांच्या विविध प्रश्नांसाठी मंत्रालयापर्यंत प्रभावी लढा दिला आहे. त्यामुळे ही निवड योग्य व सार्थक असल्याची भावना राज्यातील केंद्रप्रमुखांमध्ये व्यक्त होत आहे.यावेळी बाबाजी शिर्के यांनी लवकरच राज्यव्यापी बैठक आयोजित करण्याची माहिती दिली. तसेच संघटन बांधणी अधिक बळकट करण्यासाठी राज्याध्यक्ष व इतर पदाधिकाऱ्यांसह राज्याचा दौरा करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या निवडीचे संपूर्ण महाराष्ट्रातील केंद्रप्रमुखांनी आनंदाने स्वागत केले आहे. तसेच जिल्हाध्यक्षपदी सुनिल जाधव यांची निवड करण्यात आली आहे.

# लोकनेते आ.अब्दुल सत्तार यांच्या वाढदिवसानिमित्त सोयगावात सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांची रेलचेल

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/ विजय काळे :** लोकनेते आमदार अब्दुल सत्तार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त १ जानेवारी २०२६ रोजी नॅशनल मराठी प्राथमिक शाळा,सोयगाव यांच्या वतीने विविध समाजोपयोगी व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.या निमित्ताने विद्यार्थ्यांपासून रुग्णांपर्यंत सर्वसामान्यांपर्यंत मदतीचा हात पोहोचवण्यात आला. कार्यक्रमांतर्गत नॅशनल मराठी प्राथमिक शाळा,सोयगाव येथील सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. सोयगाव येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णांना



फळेवाटप करून मानवी संवेदना जपण्यात आली.सोयगाव येथील जिल्हा परिषद प्रशाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.नॅशनल मराठी शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. तसेच नॅशनल मराठी शाळेत क्रीडा स्पर्धांचे आयोजन करून विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाविषयक उत्साह निर्माण करण्यात आला.

या सर्व उपक्रमांना बबलू हाजी, प्रभाकर आबा काळे,प्रमोद सोळुंके,शाळेचे मुख्याध्यापक अमोल पाटील जाधव, यांच्यासह शिक्षक गजानन खराटे,सुबोध बिचारे,समाधान राकडे,गणेश खंडागळे, तुकाराम चव्हाण यांची उपस्थिती लाभली. लोकनेते आमदार अब्दुल सत्तार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ उत्सव न साजरा करता समाज,शिक्षण,आरोग्य व पर्यावरण यांना केंद्रस्थानी ठेवून राबविण्यात आलेले उपक्रम नागरिकांनी कौतुकास्पद असल्याची भावना व्यक्त केली.

## भीमा कोरेगावच्या शौर्य दिनानिमित्त परतुर येथे केले महामानवाला अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना(अशोक ठोके) :** भीमा कोरेगावचा इतिहास म्हणजे १ जानेवारी १८१८ रोजी पुणे जिल्ह्यातील भीमा नदीकाठी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी आणि पेशवे यांच्यात झालेली लढाई,ज्यात महार सैनिकांनी पेशव्यांच्या सैन्याचा पराभव केला,या विजयाचे प्रतीक म्हणून विजय स्तंभ उभारला असून, या विजयी स्तंभाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रतिवर्षी वंदन करण्यासाठी जात असत,दलित



समुदाय या दिवसाला शौर्य दिवस म्हणून साजरा करतो,ही लढाई तिसऱ्याअँग्लो-मराठा युद्धाचा भाग होती, ज्यात कमी संख्येने असलेल्या ब्रिटिश सैन्याने मराठ्यांना हरवले, आणि या विजयाने दलित समाजाला शौर्याची नवी ओळख दिली. १ जानेवारी १८१८या भीमा कोरेगावच्या शौर्य दिनानिमित परतूर येथील आंबेडकर नगरात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास प्रभाग क्रमांक 1 चे नगरसेवक सतीश सोनावणे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी आंबेडकर नगर येथील महिलांनी सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन वंदन केले.यावेळी सुधाकर पाडेवार, स्वप्निल पहाडे, सामाजिक कार्यकर्ते अविनाश पाडेवार, पत्रकार राजाभाऊ भदर्गे, शहानवाज कुरेशी, विक्रम गायकवाड, जलील भाई, अमर भाई, नामदेव ढोले, दामू म्हस्के, परमेश्वर पोळ तसेच आंबेडकर नगर येथील असंख्य बौद्ध उपासक-उपासिका उपस्थित होते.



**पाटोदा - फैसल नय्युम पठाण यांची वाघिरा सेवा सहकारी सोसायटी च्या सचिव पदी नियुक्ती झाल्या बद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत असून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.**
**(छाया-दैनिक युवक आधार पाटोदा.)**

## सामजिक कार्यकर्ते निलेश सोनावणे यांना " दादासाहेब फाळके अवॉर्ड " जाहीर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल /प्रतिनिधी :** जेष्ठ पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते निलेश सोनावणे यांना सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबाबद्दल दादासाहेब फाळके चित्रपट युनियनचा ' दादासाहेब फाळके अवॉर्ड " जाहीर झाला असून हा पुरस्कार येत्या २५ जानेवारी २०२६ रोजी रवींद्र नाट्य मंदिर मुंबई येथे चित्रपट क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. गेली पंचवीस वर्षे सामाजिक



आणि पत्रकारिता क्षेत्रात निलेश सोनावणे यांनी भरीव काम केले आहे ,पर्यावरण ,आरोग्य ,कला क्रीडा ,शैक्षणिक , सांस्कृतिक यासह पत्रकारितेत ते गेली पंचवीस वर्षे कार्यरत आहेत आपल्या लेखणीतून समाजातील पीडितांना ते न्याय हक्क मिळून देण्याचे काम करीत आहेत नुकतेच त्यांनी राजकीय क्षेत्रात देखील पदार्पण केले असून लोकनेते केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री डॉ रामदासजी आठवले यांच्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या पनवेल शहर अध्यक्ष पदी पक्ष श्रेष्टीनी त्यांची निवड केली आहे विविध क्षेत्रात काम करीत असताना त्यांनी जी जी पदे भूषविली त्या पदांना साजेसे काम करून आपल्या कामाचा ठसा उमटवला आहे रायगड नवी मुंबई पनवेल परिसरात त्यांनी आपली सामाजिक कार्याची चांगली छाप पाडली असून दलित आदिवासी, वंचित घटकांसाठी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आपल्या सामाजिक कामाचे योगदान दिले आहे .त्यांच्या या सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील कार्याची दखल घेत दादासाहेब फाळके चित्रपट युनियन चे राष्ट्रीय अध्यक्ष अजित म्हामुणकर यांनी नुकतेच त्यांना दादासाहेब फाळके अवॉर्ड जाहीर झाला असल्याचे पत्र पाठवले आहे .


## भाजपचे विजयी खाते

### पहिला उमेदवार बिनविरोध, नितीन पाटील बिनविरोध

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी) :** पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपने विजयी खाते उघडले आहे. भाजपचे प्रभाग १८ ब मधील उमेदवार नितीन जयराम पाटील हे बिनविरोध निवडून आले आहेत. विरुद्ध उमेदवाराचा अर्ज छाननीत बाद झाल्यामुळे ते बिनविरोध झाले आहेत. त्यांच्या विजयी सलामीच्या कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला.

पनवेल महानगरपालिकेची निवडणूक १५ जानेवारी रोजी होणार आहे. त्यापूर्वी अर्ज सादर करण्याची प्रक्रिया सुरु होती . ३० डिसेंबर २०२५ हा अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिवस होता. यावेळी प्रभाग १८ च्या ब जागेसाठी भाजपकडून नितीन जयराम पाटील आणि शेकाप आघाडीकडून रोहन अरविंद गावंड यांनी नागरिकांचा मागास प्रवर्ग साठी अर्ज दाखल केले होते. या अर्जाची छाननी ३१ डिसेंबर २०२५ रोजी झाली. यामध्ये रोहन गावंड याना जात पडताळणी च्या कागदपत्रांची योग्य पूर्तता न झाल्याने शेकापचे रोहन गावंड यांच्या अर्जावर हरकत घेण्यात आली. त्यावर निवडणूक निर्णय अधिकारी पावन चांडक यांनी गावंड यांचा अर्ज बाद केला असल्याचे जाहीर केले. याठिकाणी फक्त दोनच जणांनी अर्ज दाखल केल्याने भाजपचे नितीन जयराम पाटील यांचा उमेदवारी



अर्ज वैध ठरल्याने ते बिनविरोध झाल्याचे स्पष्ट झाले. भाजपकडून बिनविरोध होऊन विजयी सलामी दिल्याने त्यांच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. नितीन पाटील यांना प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण , लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी आदींनी शुभेच्छा दिल्या.

## भीमा कोरेगावच्या शौर्य दिनानिमित्त परतुर येथे केले महामानवाला अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना(अशोक ठोके) :** भीमा कोरेगावचा इतिहास म्हणजे १ जानेवारी १८१८ रोजी पुणे जिल्ह्यातील भीमा नदीकाठी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी आणि पेशवे यांच्यात झालेली लढाई,ज्यात महार सैनिकांनी पेशव्यांच्या सैन्याचा पराभव केला,या विजयाचे प्रतीक म्हणून विजय स्तंभ उभारला असून, या विजयी स्तंभाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रतिवर्षी वंदन करण्यासाठी जात असत,दलित समुदाय या दिवसाला शौर्य दिवस म्हणून साजरा करतो,ही लढाई तिसऱ्याअँग्लो-मराठा युद्धाचा भाग होती, ज्यात कमी संख्येने असलेल्या ब्रिटिश सैन्याने मराठ्यांना हरवले, आणि या विजयाने दलित समाजाला शौर्याची नवी ओळख दिली. १ जानेवारी १८१८या भीमा कोरेगावच्या शौर्य दिनानिमित परतूर येथील आंबेडकर नगरात महामानव डॉ. बाबासाहेब



आंबेडकर यांच्या पुतळयास प्रभाग क्रमांक 1 चे नगरसेवक सतीश सोनावणे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी आंबेडकर नगर येथील महिलांनी सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन वंदन केले. यावेळी सुधाकर पाडेवार, स्वप्निल पहाडे, सामाजिक कार्यकर्ते अविनाश पाडेवार, पत्रकार राजाभाऊ भदर्गे, शहानवाज कुरेशी, विक्रम गायकवाड, जलील भाई, अमर भाई, नामदेव ढोले, दामू म्हस्के, परमेश्वर पोळ तसेच आंबेडकर नगर येथील असंख्य बौद्ध उपासक-उपासिका उपस्थित होते.

## नवनिर्माण प्राथमिक शाळा,पाटोदा येथे आनंद नगरी उपक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** पाटोदा शहरातील नवनिर्माण प्राथमिक शाळा, पाटोदा येथे बुधवार दिनांक ३१/१२/२०२५ रोजी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आनंदनगरी हा उपक्रम मोठ्या उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत शाळेच्या परिसरात एक लहानशी बाजारपेठ उभारण्यात आली होती. या बाजारपेठेत विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले खाण्याचे विविध पदार्थ विक्रीस ठेवले होते. वडापाव, भजी, पोहे, लिंबू सरबत, पाव भाजी, चायनीज पदार्थ, डोसे इडली सांभार, सामोसे इत्यादी पदार्थ विद्यार्थ्यांनी स्वच्छता व नीटनेटकेपणा पाळून तयार केले होते. या सोबतच बाजारातील ताजा भाजीपाला विक्रीस ठेवण्यात आला होता. ऊस, तुरीच्या शेंगा, थेट रानातून आणलेले



गाजर यांचे स्वतंत्र स्टॉल लावण्यात आले होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञान, आर्थिक नियोजन, वेळेचे महत्त्व तसेच संघभावना यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. ग्राहकांशी नम्रपणे बोलणे, दर ठरवणे, खरेदी-विक्री करणे व हिशोब ठेवणे हे उपयुक्त धडे विद्यार्थ्यांनी आत्मसात केले. पालक व परिसरातील नागरिकांनी आनंदनगरीला भेट देऊन विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो, निर्णयक्षमता विकसित होते आणि उद्योगशीलतेची गोडी निर्माण होते. हा संपूर्ण कार्यक्रम शाळेचे मुख्याध्यापक नईम पठाण सर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीम.सानप मॅडम, श्रीम. बांगर मॅडम, श्रीम.बडे मॅडम, श्रीम.शिंदे मॅडम, श्री.डोके सर, श्री.खाडे सर, श्री. बांगर सर, श्री.रंधवे सर यांच्या सहकार्याने यशस्वीपणे पार पडला. शिक्षकवृंदाने विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करून कार्यक्रम सुरळीत पार पाडला. कार्यक्रम शेवटी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व समाधान स्पष्टपणे दिसून येत होते. सदर आनंद नगरीस प्रमुख अतिथी म्हणून प्रगती शिक्षण मंडळाच्या सचिव व भायाळा गावाच्या सरपंच सौ.सत्यभामाताई रामकृष्ण बांगर, प्राचार्य श्री.तुकाराम तुपे सर, पाटोदा केंद्राचे केंद्रप्रमुख श्री.ढेरे सर, प्राध्यापक सुधीर नंद सर, श्री.घुमरे सर, श्रीम.भोपळे मॅडम व त्यांचा संपूर्ण स्टाफ तसेच इतर मान्यवर, शाळेतील पालक वर्ग आणि पाटोदा शहरातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

# आ. बाबुराव कदम यांच्या हस्ते 'संकल्प 2026' दिनदर्शिकेचे प्रकाशन

**हदगाव | प्रतिनिधी / विश्वदीप कांबळे :** हदगाव–हिमायतनगर तालुक्याचे लोकप्रिय आमदार बाबुरावजी कदम कोहळीकर यांच्या शुभहस्ते सौ. विद्याताई जयदिप जाधव कोळीकर लिखित 'संकल्प 2026' या प्रेरणादायी दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा आमदार साहेबांच्या कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

'संकल्प 2026' या दिनदर्शिकेमधून सामाजिक जाणीव, आत्मविश्वास, महिलांचे सक्षमीकरण तसेच भविष्याकडे सकारात्मक दृष्टिकोन यांचा प्रभावी संदेश देण्यात आला आहे. सौ. विद्याताई जयदिप जाधव कोळीकर यांच्या सामाजिक व वैचारिक कार्याचा हा एक महत्त्वपूर्ण टप्पा असून, त्यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.



यावेळी आमदार बाबुरावजी कदम कोहळीकर यांनी दिनदर्शिकेचे विशेष कौतुक करत सौ. विद्याताई जयदिप जाधव कोळीकर यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी हदगाव–हिमायतनगर विधानसभेचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर, साहेबराव पाटील वाटेगावकर, बबनराव कदम, मंचक कदम, विनोद कदम, तुकाराम तवर, जयदिप जाधव कोळीकर यांच्यासह अनेक शिवसैनिक व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मराठमोळ्या लाठीचा "कडकडाट" सहाव्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राने गाजवले मैदान

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर/उरण प्रतिनिधी :** उज्जैन (मध्यप्रदेश) येथे दि. २७ व २८ डिसेंबर रोजी ६वी राष्ट्रीय लाठी स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत देशभरातील विविध राज्यांमधील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. महाराष्ट्र संघातील विद्यार्थ्यांनी एक काठी व दोन काठी या लाठी प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत अनेक पदकांची कमाई केली.

या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले. परेश पावसकर याने गोल्ड व ब्राँझ पदक, नितेश मोहिते याने सिल्वर व ब्राँझ पदक, सर्वेश मोरे व ऋतिक राजपूत यांनी प्रत्येकी सिल्वर पदक पटकावले. रुद्रा सकपाल, नेहा घरत (२ ब्राँझ), गौरांश शेडगे, यश गायकवाड, रक्षण उदयकुमार, गोपाळ म्हात्रे यांनी ब्राँझ पदक मिळवले. तसेच शरण्या गुंडारकर, सर्वस्वी गुंडारकर, अंजलीना विश्वकर्मा, शहनाज शेख, कृतिका सूर्यवंशी, हृदवी म्हात्रे, वैष्णवी माने, जयश्री राठोड, प्रिन्स सूर्यवंशी, राज गायकवाड व रोहित घरत यांनीही स्पर्धेत उल्लेखनीय सहभाग नोंदवला.



एकूण कामगिरीच्या जोरावर महाराष्ट्र संघाला सर्वोत्कृष्ट संघ म्हणून घोषित करत चॅम्पियन ट्रॉफी प्रदान करण्यात आली.या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिहान राजू कोळी (महाराष्ट्र अध्यक्ष, लाठी संघ), ॲड. नितीन मोहिते, गोपाळ म्हात्रे, परेश पावसकर, अंजा माने, सुळभा कोळी, कृष्ण कोळी (संघ व्यवस्थापक),यांनी केले विघ्नेश कोळी, निकिता कोळी, प्रियांका मोहिते, माधुरी म्हात्रे व गणेश म्हात्रे यांचा समावेश होता.तसेच गोपाळ म्हात्रे, परेश पावसकर, अंजा माने, रोहित घरत यांनी या स्पर्धेत राष्ट्रीय पंच म्हणून कामगिरी बजावली.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी देवेंद्रसिंग तोमर (प्रदेश प्रवक्ता) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी राजपाल सिंग सिसोदिया, कार्यकारिणी अध्यक्ष शिवप्रताप सिंग चौहान, सह-आयोजक विशाल सिंह सोलंकी, महासचिव गजानन राजपूत, चेअरमन राजू नेवार, राहुल दुबे, अरविंद जोशी व प्रमोद विश्वकर्मा यांचीही उपस्थिती होती."लाठी चालली महाराष्ट्र जिंकला" उज्जैन मधील राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राच्या शिलेदारांचे मिळवलेल्या घवघवीत यशाबद्दल महाराष्ट्र संघातील सर्व खेळाडूंचे व मार्गदर्शकांचे सर्व स्तरांतून अभिनंदन व कौतुक होत आहे.

# नालंदा आंतरराष्ट्रीय परिषदेत मराठीचा डंका; पत्रकार अनिल साबळे मांडणार विचार

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/सिल्लोड :** बिहार राज्यातील ज्ञानाची पावन भूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ऐतिहासिक नालंदा विद्यापीठामध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत महाराष्ट्राचा आवाज घुमणार आहे. सार्क जर्नालिस्ट फोरम व आम्रपाली कला साहित्य संमेलन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या जागतिक परिषदेत छत्रपती संभाजीनगरचे सुपुत्र आणि दूरदर्शनचे जिल्हा प्रतिनिधी अनिल साबळे मराठी मातृभाषा व मराठी पत्रकारितेचे प्रतिनिधित्व करणार आहेत.



येत्या ४ आणि ५ जानेवारी रोजी होणाऱ्या या दोन दिवसीय परिषदेसाठी भारत, नेपाळ, श्रीलंका, भूतान, मॉरिशस, बांगलादेश, थायलंड, म्यानमार आणि अफगाणिस्तान यांसह १० हून अधिक देशांतील नामवंत पत्रकार व विचारवंत उपस्थित राहणार आहेत. गेल्या काही वर्षांपासून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या अभ्यासू वृत्तीने स्वतंत्र ठसा उमटवणाऱ्या अनिल साबळे यांना या प्रतिष्ठेच्या परिषदेत प्रमुख वक्ता म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे. ते यावेळी 'मराठी मातृभाषा आणि मराठी पत्रकारितेसमोरील आव्हाने' या विषयावर आपले विचार मांडतील.

या परिषदेला बिहारचे राज्यपाल माननीय गंगा प्रसाद, मॉरिशसच्या आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक कार्यकर्त्या डॉ. सरिता बुद्धू, सार्क जर्नलिस्ट्स फोरमचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजू लामा (नेपाळ), सरचिटणीस अब्दुल रहमान (बांगलादेश) आणि थायलंडचे डॉ. पी. सी. चंद्रा यांसारख्या जगभरातील दिग्गजांची उपस्थिती लाभणार आहे. देश-विदेशातील सुमारे २०० हून अधिक पत्रकार या परिषदेत सहभागी होऊन मातृभाषेच्या संवर्धनावर चर्चा करणार आहेत. जागतिक स्तरावरील या महत्त्वाच्या व्यासपीठावर मराठी पत्रकारितेचा गौरव होणार असल्याने अनिल साबळे यांच्यावर सर्वच स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# गायनाच्या माध्यमातून सामाजिक जनजागृतीचे कार्य - दत्ता माधव खतगावकर यांचे उल्लेखनीय योगदान

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी/विश्वदीप कांबळे :** आष्टी (ता. हदगाव, जि. नांदेड) येथील रहिवासी दत्ता माधव खतगावकर हे गेल्या अनेक वर्षांपासून गायन व लोककलेच्या माध्यमातून सामाजिक जनजागृतीचे कार्य सातत्याने करत आहेत. ते एक बहुगुणी कलाकार असून गायक, वादक कलाकार, प्रबोधनकार, भजनकार, साहित्यकार व कीर्तनकार म्हणून त्यांची ओळख आहे. समाजामध्ये बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी आपल्या कलेचा प्रभावी वापर केला आहे.

दारूबंदी, स्त्रीभ्रूणहत्या प्रतिबंध, पर्यावरण संवर्धन, ग्राम स्वच्छता अभियान, अंधश्रद्धा निर्मूलन व जनजागृती तंत्रशक्ती अशा विविध सामाजिक विषयांवर ते आपल्या गायनातून प्रबोधन करत आहेत.सामाजिक भान जपत कला समाजासाठी वापरण्याचा आदर्श दत्ता माधव खतगावकर यांनी निर्माण केला असून त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. भविष्यातही ते आपल्या कलेच्या माध्यमातून समाजहिताचे कार्य अधिक व्यापक पातळीवर करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



# जलजीवन मिशनच्या कामात शेतकऱ्याची अधिकृत सिंचन पाईपलाईन फोडून लाखोंचे नुकसान

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत टाकसाळ :** गुगुळ पिंपरी येथील शेतकरी श्री. शिवराम धोत्रे यांच्या शेतात शासकीय परवाना घेऊन टाकलेली सिंचन पाईपलाईन जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या कामादरम्यान फोडण्यात आल्याने त्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. संबंधित ठेकेदाराने पाईपलाईन तुटल्यास तात्काळ जोडून देण्याचे आश्वासन दिले होते; मात्र वारंवार विनंत्या करूनही आजतागायत पाईपलाईन जोडून देण्यात आलेली नाही.श्री. धोत्रे यांनी सन 2024 मध्ये वाशिम पाटबंधारे विभागाकडून उपसा सिंचनाचा शासकीय परवाना (जा.क्र. 1742) घेतला असून आवश्यक नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करून गायरान गट क्रमांक 546 मधून अधिकृतरित्या सिंचन पाईपलाईन टाकलेली होती. मात्र ऑगस्ट 2024 मध्ये जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या विहीर खोदकामादरम्यान ही पाईपलाईन फोडण्यात आली.

या प्रकारामुळे गट क्रमांक 505 मधील सुमारे 04 हेक्टर शेती गेल्या दोन वर्षांपासून सिंचनाविना पडीत राहिली असून अंदाजे 3 ते 4 लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच सिंचन परवान्यासाठी भरलेली ₹6,000/- रक्कमही वाया गेली आहे.या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, फोडलेली पाईपलाईन तात्काळ पूर्ववत जोडून द्यावी तसेच झालेल्या नुकसानीची योग्य ती नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी ठाम मागणी श्री. शिवराम धोत्रे यांनी प्रशासनाकडे केली आहे.दरम्यान, 8 दिवसांच्या आत कोणतीही कार्यवाही न झाल्यास ग्रामपंचायत कार्यालय, गुगुळ पिंपरी समोर कुटुंबासह आमरण उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

# ३४ वर्षांच्या ज्ञानयज्ञाची 'दौड' थांबली !

## संजीव दौड सरांच्या निरोपाने शिवाजी विद्यालय गहिवरले;

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/सिल्लोड :** ज्या शाळेच्या भिंतींनी आणि मैदानांनी तब्बल तीन दशकांहून अधिक काळ त्यांच्या शब्दांची साक्ष काढली, त्याच प्रांगणातून निवृत्त होताना आज सर्वांचेच डोळे पाणावले. राजर्षी शाहू शिक्षण संस्थेच्या सिल्लोड येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक संजीव दौड यांचा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती सोहळा दि.३१ डिसेंबर रोजी अत्यंत भावूक वातावरणात पार पडला. ३४ वर्षांच्या प्रदीर्घ आणि निष्कलंक ज्ञानदानानंतर संजीव दौड आज आपल्या सेवेतून मुक्त झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे नवनियुक्त मुख्याध्यापक कृष्णा सपाटे हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक गजानन डमाळे व सेवानिवृत्त शिक्षक रमेश सोनवणे यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलताना विद्यालयाचे पर्यवेक्षक निशांत मस्के यांनी संजीव दौड यांच्या देदीप्यमान कारकिर्दीचा आढावा घेतला. एक शिस्तप्रिय शिक्षक आणि तितकेच मृदू मनाचे मुख्याध्यापक म्हणून दौड सरांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.




अमोल ताटू आणि अरविंद सोनवणे यांनी आपल्या मनोगतातून सरांच्या मार्गदर्शनाखालील आठवणींना उजाळा दिला. सत्काराला उत्तर देताना संजीव दौड भावूक झाले, "संस्था आणि विद्यार्थी हेच माझे आयुष्य राहिले," अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.या सोहळ्याचे नेटके सूत्रसंचालन गणेश चव्हाण यांनी केले. प्रारंभी गजानन दौड यांनी प्रास्ताविक सादर केले, तर आभार रमेश परदेशी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संगीता तायडे, संगीता काळे, मधुकर मगर, लक्ष्मण कोलोड, नरेशसिंग राजपूत, अंगद काळे, भास्कर सागरे, श्रीमती वडमारे, हर्षदा सनांसे तसेच प्राथमिक विभागाचे राजू गाढवे, अमोल दांडगे, भाऊसाहेब गावंडे, गणेश सुरडकर, अमोल पालोदकर, रामेश्वर वाघ, शितल गीते, सुवर्णा तारो, मीरा पांगळे आणि सोनाली जाधव यांच्यासह संपूर्ण कर्मचारी वृंदाने अथक परिश्रम घेतले

# मंगरूळच्या शिवारात 'गोदावरी'चा थाट; महाबीजच्या तुरीने आधुनिक शेतीचा जागर!

## प्रगतशील शेतकरी श्रीधर कुलकर्णी यांच्या शेतावर पीक प्रात्यक्षिक संपन्न

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर (सिल्लोड) :** बदलत्या हवामानात शेतीपुढील आव्हाने पेलण्यासाठी शेतकऱ्यांनी आता पारंपारिक पद्धतीला आधुनिक विज्ञानाची जोड देणे आवश्यक झाले आहे. याच उद्देशाने मंगरूळ येथे महाबीज, कृषी विभाग आणि वेलस्पन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'तूर पीक व जैविक खत' मार्गदर्शन मेळावा उत्साहात पार पडला. महाबीजच्या 'गोदावरी' या तुरीच्या वाणाने आणि प्रगत जैविक खतांनी यावेळी उपस्थित शेतकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले.कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक महाबीजचे विभागीय व्यवस्थापक राजाभाऊ मोकळे यांनी यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधला. ते म्हणाले की, "महाबीज ही शेतकऱ्यांची स्वतःची संस्था असून, शेतकऱ्यांना शासनमान्य रास्त दरात






उच्च दर्जाचे बियाणे पुरवून त्यांची आर्थिक लूट थांबवण्याचे काम महाबीज करत आहे. जोपर्यंत महाबीज आपले दर जाहीर करत नाही, तोपर्यंत बाजारपेठेत खासगी कंपन्यांनाही दर वाढवता येत नाहीत, हाच महाबीजचा दरारा आहे".जिल्हा कृषी अधिकारी सचिन सोनोने यांनी बीजप्रक्रिया आणि जमिनीचा पोत सुधारण्यावर भर दिला.

> "महाबीजच्या मार्गदर्शनामुळे आणि त्यांच्या जैविक खतांच्या वापरामुळे माझ्या तुरीचे पीक अतिशय दर्जेदार आले आहे. कमी खर्चात जास्त उत्पादन घेण्यासाठी अशा उपक्रमांचा आम्हा शेतकऱ्यांना मोठा आधार मिळतो."
>
> — श्रीधर कुलकर्णी, प्रगतशील शेतकरी

वेलस्पन फाऊंडेशनचे व्यवस्थापक निखिल कुलकर्णी व आशिष भोरे यांनी आधुनिक शेतीतील फाऊंडेशनच्या योगदानाबद्दल आणि 'बेटर कॉटन इनिशिएटिव्ह' (BCI) प्रकल्पांतर्गत राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. आत्माचे कुंभारे सर व कृषी सहाय्यक अधिकारी सपकाळ सर यांनी विविध शासकीय योजनांची माहिती देऊन तांत्रिक शंकांचे निरसन केले.

सिल्लोड तालुक्यातील प्रगतशील शेतकरी श्रीधर कुलकर्णी यांच्या शेतात राबवण्यात आलेल्या तूर पीक प्रात्यक्षिकाची यावेळी उपस्थित मान्यवर व शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. महाबीजच्या 'पी.एस.बी.' व 'के.एम.बी.' यांसारख्या द्रवरूप जैविक खतांमुळं आणि 'ट्रायकोडर्मा विरिडी' या बुरशीनाशकाच्या वापरामुळे पिकाची झालेली जोमदार वाढ पाहून उपस्थित शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.या मेळाव्याला परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषी विभाग आणि वेलस्पन फाऊंडेशनच्या प्रतिनिधींनी विशेष परिश्रम घेतले.

# चाईल्ड प्रायमरी स्कूलच्या विद्यार्थ्यांची तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनास भेट



**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी/मारुती सत्रे :** तालुक्यातील चाईल्ड प्रायमरी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी 31 डिसेंबर रोजी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनास शैक्षणिक भेट दिली. या भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे तसेच नवकल्पनांची ओळख करून देणे हा होता.या विज्ञान प्रदर्शनामध्ये विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी तयार केलेली शास्त्रीय मॉडेल्स, प्रयोग व प्रकल्प मांडण्यात आले होते. ऊर्जा संवर्धन, पर्यावरण संरक्षण, जलव्यवस्थापन, आरोग्य व तंत्रज्ञान या विषयांवरील प्रकल्पांनी विद्यार्थ्यांचे विशेष लक्ष वेधून घेतले.चाईल्ड प्रायमरी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी हे सर्व प्रकल्प उत्सुकतेने पाहिले व संबंधित विद्यार्थ्यांशी संवाद साधून माहिती जाणून घेतली. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना प्रत्येक प्रकल्पाचे शास्त्रीय महत्त्व समजावून सांगितले.या शैक्षणिक भेटीमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली असून विज्ञान विषयाबद्दलची गोडी वाढण्यास मदत झाली आहे. या उपक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व शिक्षक तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले या बद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

**daily YUVAK ADHAR** Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# प्रभाग २० मध्ये काँग्रेस महाआघाडीची 'धडाकेबाज' एन्ट्री

## समाजसेविका रुपाली शिंदे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग २० मधील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. काँग्रेस महाआघाडीच्या अधिकृत उमेदवार, प्रसिद्ध समाजसेविका तथा निर्भीड पत्रकार सौ. रुपाली राम शिंदे यांनी अत्यंत उत्साहात आणि शक्तीप्रदर्शनाने आपला उमेदवारी अर्ज प्रांत कार्यालयात दाखल केला. त्यांच्या या 'धडाकेबाज' एन्ट्रीमुळे प्रभागात परिवर्तनाचे वारे वाहू लागल्याची चर्चा रंगली आहे.




रुपाली शिंदे यांची ओळख एक अभ्यासू आणि आक्रमक पत्रकार म्हणून आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी आजवर सर्वसामा न्यांचे प्रश्न, प्रशासकीय त्रुटी आणि जनसामान्यांच्या समस्यांना वाचा फोडली आहे. आता केवळ प्रश्न न मांडता ते सोडवण्याच्या निर्धाराने त्यांनी सक्रिय राजकारणात पाऊल ठेवले आहे. "पत्रकारितेतून समाजकारणात ठोस पाऊल टाकत त्यांनी प्रभाग २० च्या विकासासाठी कंबर कसली आहे. 66 उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना रुपाली शिंदे म्हणाल्या की, "प्रभाग २० मधील रखडलेले विकासकामं आणि सामान्यांचे प्रश्न मार्गी लावणे हेच माझे मुख्य ध्येय आहे. जनतेने माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे, त्याला मी तडा जाऊ देणार नाही. हा लढा केवळ माझा नसून प्रभाग २० मधील प्रत्येक नागरिकाचा आहे." - सौ. रुपाली शिंदे यांच्या उमेदवारीमुळे प्रभाग २० मध्ये आता काँग्रेस महाआघाडीचे पारडे जड झाल्याचे चित्र दिसत असून, विरोधकांचे धाबे दणाणले आहेत. जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद उमेदवारी अर्ज दाखल करतेवेळी काँग्रेस महाआघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि प्रभाग २० मधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. "जनतेचा आवाज, परिवर्तनाचा निर्धार" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. सौ. रुपाली शिंदे यांच्या रूपाने प्रभागाला एक सुशिक्षित, सुसंस्कृत आणि जनतेच्या प्रश्नांची जाण असलेली महिला उमेदवार मिळाल्याने महिला वर्गातही मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.

# माहूर -किनवट राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात

## दुचाकीस्वार जागीच ठार, कार चालक गंभीर

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी सय्यद इसा/ माहूर :** माहूर–किनवट राष्ट्रीय राज्यमार्गावरील नखेगाव फाट्याजवळ महिंद्रा इको चारचाकी व दुचाकी यांच्यात समोरासमोर झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला असून चारचाकी चालक गंभीर जखमी झाला आहे. ही दुर्घटना आज (दि. ३१) दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडली. अपघात इतका भीषण होता की रस्त्यावर रक्ताचा सडा पडला होता.



माहूर येथील रुपेश गुलाबराव आराधे (वय २९) हे वाई बाजार येथे राहणाऱ्या बहिणीस भेटण्यासाठी महिंद्रा इको (क्रमांक एम.एच. २७ ए.आर. ९२१०) या वाहनाने गेले होते. परत येत असताना नखेगाव फाट्याजवळ समोरून येणाऱ्या दुचाकीला त्यांच्या वाहनाची जोरदार धडक बसली. या अपघातात दुचाकीस्वार जयराम कोमल प्रसाद मिश्रा (वय ६०, रा. सायफळ, ता. माहूर) हे शाईन कंपनीच्या मोटरसायकलवर (क्रमांक एम.एच. ए.जे. १५८९) प्रवास करत होते.

धडकेनंतर मोटरसायकल शेकडो फूट दूर फेकली गेली. या भीषण अपघातात जयराम मिश्रा यांचा जागीच मृत्यू झाला, तर रुपेश आराधे हे गंभीर जखमी झाले. जखमी आराधे यांच्यावर माहूर ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर मंगेश वाघमारे यांनी प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी यवतमाळ येथे रेफर केले.घटनेची माहिती मिळताच माहूरचे पोलीस निरीक्षक देविदास चोपडे, सहायक पोलीस निरीक्षक शरद घोडके यांच्यासह पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतक व जखमींना रुग्णालयात हलवले. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# 'चालती-बोलती शाळा' भरविणाऱ्या संदीप इंगळे यांचा 'जिजामाता कन्या विद्यालयात' सत्कार

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड :** एसटीचा प्रवास म्हणजे केवळ प्रवाशांची ने-आण नसून, तो संस्कार आणि ज्ञानाचा मार्ग ठरू शकतो, हे सिल्लोड आगारातील वाहक संदीप नारायण इंगळे यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले आहे. त्यांच्या या अनोख्या शैक्षणिक उपक्रमाची दखल घेत सिल्लोड येथील जिजामाता कन्या विद्यालयाच्या वतीने त्यांचा गौरवपूर्ण सत्कार करण्यात आला.



संदीप इंगळे हे गेल्या पाच वर्षांपासून सिल्लोड-भोकरदन मार्गावर धावणाऱ्या बसमध्ये सातवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना केवळ तिकीट देत नाहीत, तर त्यांना पाढे, वर्ग, विज्ञानातील मूलद्रव्यांची नावे आणि शेतीविषयक उपयुक्त माहिती देतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक जगात टिकता यावे, यासाठी त्यांनी बसचे रूपांतर एका 'चालत्या-बोलत्या शाळेत' केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक विद्यार्थ्यांनी दहावीत ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवले आहेत.याच सामाजिक बांधिलकीचे कौतुक करण्यासाठी जिजामाता कन्या विद्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र कावले यांच्या हस्ते इंगळे यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी कैलास जगताप, संजय रेगुलवाड, दत्तात्रय गिरी, पांडुरंग चित्तेवाड, सायली सोनवणे, विशाल उबरहंडे, छाया सोनवणे, रवींद्र सोनवणे, प्रशांत मस्के आणि भगवान दांडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# भिमा कोरेगावला जाणाऱ्या भिमसैनिकांनी वढबुद्रकला भेट द्यावी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** भिमा कोरेगाव विजय स्तंभाला सलामी देण्यासाठी दरवर्षी मोठ्या संख्येने भिम सैनिक अभिवादनासाठी जातात. या पार्श्वभूमीवर, आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी भिम सैनिकांना एक महत्त्वाचे आवाहन केले आहे.



भिमा कोरेगाव येथे जाताना किंवा परत येताना वढबुद्रक येथे थांबून गोविंद गणपत महार गायकवाड यांच्या समाधीचे आवर्जून दर्शन घ्यावे, असे त्यांनी सांगितले. गोविंद गणपत महार गायकवाड हे सामाजिक न्याय, समता आणि मानवतेसाठी लढणारे महान व्यक्तिमत्त्व असून त्यांच्या कार्याचा आणि बलिदानाचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

भिमा कोरेगावचा विजय स्तंभ हा केवळ ऐतिहासिक स्मारक नसून तो शोषित-वंचित समाजाच्या स्वाभिमानाचे प्रतीक आहे. त्या स्वाभिमानाच्या लढ्याला दिशा देणाऱ्या महापुरुषांच्या स्मृती जपणे हे प्रत्येक भिम सैनिकाचे कर्तव्य असल्याचेही नारायण बागडे यांनी नमूद केले. वढबुद्रक येथील गोविंद गणपत महार गायकवाड यांच्या समाधीस्थळाला भेट देऊन त्यांच्या विचारांना अभिवादन केल्यास भिमा कोरेगावच्या लढ्याचा खरा अर्थ अधिक खोलवर समजेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# धनगर जमातीच्या एस टी प्रवर्गात आरक्षणाच्या मागणीसाठी दिपक बोह्राडे यांचा परभणी दौरा

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे/पाथरी :** धनगर जमातीच्या एस टी प्रवर्गात आरक्षणाच्या मागणीसाठी दिपक बोह्राडे यांचा परभणी जिल्हा दौरा आयोजित करण्यात आला आहे दि २ जानेवारी रोजी ते सकाळी १० वाजता मांडाखळी ११ वाजता भारसवाडा. हाटकरवाडी १२ वाजता शेळगाव (महाविष्णू) १२:१५ वाजता सायखेडा १२:३० वाजता कोरटेक १२:४५ वाजता वंदन १२:५५ उखळी फाटा १ वाजता कारबेटवाडी १:१० वाजता करम २ वाजता नरवाडी २:१० वाजता सोनपेठ २:१५ वाजता विटा ३ वाजता लिंबा ४:१० वाजता बाभळगाव फाटा ४:३० वाजता पाथरी सांय ५ वाजता सेलू असा दौरा आयोजित केला आहे या वेळी धनगर बांधवांनी




त्या ठिकाणी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात सखल धनगर समाजाच्या वतीने करण्यात आले आहे

# श्रीवर्धन नगरपालिकेत नवे पर्व : नगराध्यक्ष ॲड. अतुल चौगुले यांनी स्वीकारला पदभार

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहित :** श्रीवर्धन नगरपालिकेमध्ये आज प्रशासन प्रमुख व श्रीवर्धन नगरीचे प्रथम नागरिक म्हणून नवनिर्वाचित नगराध्यक्ष ॲडव्होकेट श्री. अतुल चौगुले यांनी औपचारिकरित्या पदभार स्वीकारला. यानिमित्ताने नगरपालिकेत पदभार स्वीकारण्याचा सोहळा उत्साहात पार पडला.



या सोहळ्यास नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी, नगरसेवक, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पदभार स्वीकारल्यानंतर नगराध्यक्ष ॲड. अतुल चौगुले यांनी श्रीवर्धन शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पारदर्शक, लोकाभिमुख व गतिमान प्रशासन देण्याचा संकल्प व्यक्त केला.शहरातील पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य, पर्यटन विकास तसेच नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांना प्राधान्य देऊन काम करण्यात येईल, असे त्यांनी यावेळी सांगितले. श्रीवर्धनचा ऐतिहासिक, सांस्कृतिक व पर्यटनदृष्ट्या विकास साधण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन कार्य करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

पदभार स्वीकारण्याच्या या सोहळ्यामुळे श्रीवर्धन नगरपालिकेत नव्या नेतृत्वाची सुरुवात होत असून, शहराच्या विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# रेवदंडा बीचवर एकता मित्र मंडळाचा भव्य 'बीच उत्सव' : नववर्षाच्या स्वागताला सर्वधर्मसमभावाचा अनोखा संगम

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :** राजकारणापासून दूर, एकतेच्या धाग्यात बांधलेल्या रेवदंडा गावात वर्षाच्या शेवटच्या रात्री (३१ डिसेंबर) एकता मित्र मंडळाने आयोजित 'बीच उत्सव - जल्लोष नवीन वर्षाचा' कार्यक्रमाने संपूर्ण समुद्रकिनारा आनंदाच्या लाटांनी बहरला. सांस्कृतिक कला, नृत्य आणि संगीताचा संगम घालून पर्यटक आणि स्थानिक नागरिकांना अविस्मरणीय रात्र भेटली. या कार्यक्रमाने रेवदंड्याच्या एकधर्मसमभावाची, परस्पर विश्वासाची आणि सुसंस्कृत स्वरूपाची जीवंत उदाहरणे समोर आणली, ज्यामुळे गावकऱ्यांच्या हृदयात गोडवा शिरला.सर्वधर्मीय नागरिक




आणि बाहेरून आलेल्या पर्यटकांनी एकत्र येऊन सहभागी होत, ऑर्केस्ट्राच्या मंत्रमुग्ध सुमधुर संगीतावर नाचगाणी केली. उत्कृष्ट खाद्य स्टॉल्सनी तोंडाला आनंद दिला, तर रंगीत दिवे आणि लाईटिंगने समुद्रकिनारा उत्सवमय वातावरणाने न्हाऊन निघाला. पर्यटक म्हणाले, "एकता मित्र मंडळाच्या या योजनेमुळे आमचा २०२६ चा नवीन वर्षाचा जल्लोष द्विगुणीत झाला. रेवदंड्याचे स्वागत असे हृदयस्पर्शी असावे!" गावकऱ्यांनीही सांगितले, "या कार्यक्रमाने आमचा परस्पर विश्वास अधिक दृढ झाला. अशी एकता आमच्या गावाची खरी ओळख आहे."कार्यक्रमाचे मुख्य आयोजक संतोष उर्फ बाबू मोरे म्हणाले, "नवीन वर्षात पाऊल ठेवताना धैर्याने विचार करू, निर्णायकपणे कृती करू आणि मजबूत, समावेशक भविष्यासाठी एकत्रितपणे काम करूया. चला, एकता, दृढनिश्चय आणि आशावादाने पुढे जाऊया." एकता मित्र मंडळाचे अध्यक्ष प्रफुल्ल मोरे, बाबू मोरे, संदीप खोत, विजय हाडकर, उमेश मोरे, निलेश खोत, आशिष गोंधळी, रोहन कारेकर, नंदू सातमकर, चंद्रकांत दांडेकर यांसह सहकाऱ्यांनी अप्रतिम नियोजन करून रेवदंडा गावाच्या एकतेचे दर्शन घडवले.या उत्सवाने पर्यावरणस्नेही पद्धतीने साजरा करून रेवदंड्याचे सुसंस्कृत स्वरूप अधोरेखित केले. प्लास्टिकविरहित स्टॉल्स, स्वच्छ समुद्रकिनारा आणि सामुदायिक सहभागाने गावकरी आणि पर्यटक दोघेही नटले. अशा कार्यक्रमांमुळे रेवदंडा पर्यटनस्थळ म्हणून अधिक आकर्षक होत आहे. सर्वांना आनंदी, निरोगी आणि समृद्ध २०२६ च्या नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

# वाशिम जिल्ह्यातील अतिवृष्टी व विम्या.ची रक्कम शेतकऱ्याच्या खात्यात जमा करा

## याबाबत.लखनसिंग ठाकूर यांचे कृषिमंत्र्याकडे साकडे

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी/ रणजितसिंह ठाकुर :** वाशिम जिल्ह्यामध्ये खरीप हंगामात नैसर्गिक आपत्तीमुळे पिकाचे अतोनात नुकसान झाले होते नैसर्गिक आपत्तीमध्ये अतिवृष्टी कीड रोगासारख्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये पिकाची आठवण नुकसान झाली. खरीप हंगामात मध्ये अतिवृष्टी सततदार पावसामुळे सोयाबीन व अन्य पिकाची आतोनात नुकसान झाले कृषिमंत्री व आपले पालकमंत्री यांनी संपूर्ण जिल्ह्यामध्ये त्या दरम्यान दौरा सुद्धा केला होता विमाधारक शेतकऱ्यांना उत्पन्नाच्या आधारे सरसकट भरपाई दिल्ली जाणार असल्याबाबतचे कृषिमंत्र्यांनी निर्देशित सुद्धा केले होते,

रिसोड तालुक्यातील सर्वाधिक जवळपास 25 हजार शेतकरी बांधवा ना खरीप हंगामात अतिवृष्टी व सततधार पावसामुळे अतोनात नुकसान झाले सोयाबीन वांसह सर्वच पिके उध्वस्त झाले होते सध्या शेतकरी बांधव अत्यंत अडचणीत असून जुलै ऑगस्ट महिन्यात अतिवृष्टी झाल्याने शेतकरी हवालदिल झालेला आहे, या अडचणीच्या काळात शेतकरी बांधवांना त्यांनी विमा काढलेल्या पिकांचा विम्याची रक्कम, अतिवृष्टीची रक्कम त्यांच्या खात्यात जमा झाले तर तालुक्यातील सर्व



शेतकरी बांधवांना त्यांना खूप मोठा हातभार लागू शकतो, जिल्ह्यातील विमाधारक कंपनीशी संपर्क साधला असता आम्हाला आमच्या कंपनीला तशा प्रकारच्या कुठल्याही सूचना नसल्याबाबत सांगण्यात येत आहे, त्यामुळे आपल्या महायुती सरकारची नाहक बदनामी होत आहे व शेतकरी बांधवांकडून विमा कंपन्या बाबत ओरड निर्माण होत आहे तरी कृपया वाशिम जिल्ह्यातील त्यातल्या त्यात रिसोड तालुक्यातील शेतकरी बांधवांना त्यांच्या विमा भरलेल्या ची रक्कम तसेच अतिवृष्टीची रक्कम तात्काळ त्यांच्या खात्यात जमा करण्यात यावी याबाबत वआदेशित करून तात्काळ शेतकऱ्याच्या खात्यामध्ये विम्याची पैसे जमा करण्याकरिता आपल्या स्तरावरून आदेशित करण्यात यावेत याबाबत भाजपाचे लखनसिंग ठाकूर यांनी निवेदन पाठविले.

# एसटी महामंडळाच्या गलथान कारभारामुळे प्रवाशांचे हाल

## माणगाव–श्रीवर्धन मार्गावर नियोजनाचा अभाव ठळक

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/ अनिकेत मोहित :** एसटी महामंडळाच्या गलथान व निष्काळजी कारभाराबाबत यापूर्वी अनेक वेळा वृत्तपत्रांतून आवाज उठवण्यात आला आहे. मात्र, दुर्दैवाने अद्यापही या समस्यांवर ठोस तोडगा निघालेला दिसत नाही. ड्रायव्हर अभावी गाड्या रद्द करणे, वेळेवर न सुटणाऱ्या बसेस, तसेच फेऱ्यांचे अपुरे नियोजन याचा फटका थेट सामान्य प्रवाशांना बसत आहे.



एसटी ही सर्वसामान्यांची जीवनवाहिनी मानली जाते. मात्र, प्रत्यक्षात प्रवाशांना मिळणारी वागणूक आणि सेवा पाहता महामंडळ आपली जबाबदारी विसरत असल्याचे चित्र आहे. अनेक वेळा एसटी कर्मचाऱ्यांकडून प्रवाशांशी उर्मटपणे वागले जात असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. विशेष म्हणजे, ओळखीच्या प्रवाशांना वेगळी वागणूक आणि सामान्य, अनोळखी प्रवाशांना दुय्यम वागणूक दिली जात असल्याचे प्रकार वारंवार निदर्शनास येतात. यामुळे प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

माणगाव हा श्रीवर्धनकडे ये-जा करण्यासाठीचा मुख्य आणि महत्त्वाचा थांबा आहे. मात्र, याच माणगावहून श्रीवर्धनकडे जाण्यासाठी प्रवाशांना मोठी कसरत करावी लागत आहे. वेळापत्रकानुसार बस उपलब्ध नसणे, अचानक गाडी रद्द होणे किंवा तासन्तास उशिराने बस सुटणे, यामुळे विद्यार्थी, नोकरदार, महिला व ज्येष्ठ नागरिकांचे हाल होत आहेत.

पर्यटन, व्यापार व दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या श्रीवर्धन तालुक्याकडे येणाऱ्या प्रवाशांच्या गरजा लक्षात घेऊन एसटी महामंडळाने तातडीने फेऱ्यांचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. तसेच, कर्मचारी प्रशिक्षण, प्रवाशांशी सौजन्यपूर्ण वर्तन आणि वेळेवर सेवा देण्याबाबत कठोर अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. जोपर्यंत एसटी महामंडळ प्रवाशांना केंद्रस्थानी ठेवून निर्णय घेत नाही, तोपर्यंत 'सर्वसामान्यांची वाहतूक सेवा' ही संकल्पनाच केवळ कागदावर राहील, अशी भावना आता प्रवाशांमधून व्यक्त होत आहे.

# विहिरीत आढळला पती-पत्नीचा मृतदेह, तीन अपत्यांवर दुःखाचा डोंगर

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड तालुका :** थेटाळे (ता. निफाड) येथे मध्यरात्रीच्या सुमारास विहिरीत तरुण पती-पत्नीचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे त्यांच्या तीन अपत्यांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, संपूर्ण गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.




याबाबत माजी पोलीस पाटील बाळकृष्ण पर्वत पवार यांनी लासलगाव पोलीस ठाण्यात खबर दिली आहे. दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास मयतांचे शेत, गट क्रमांक ११४ येथील विहिरीत योगेश भाऊसाहेब शिंदे (वय ३५) व पत्नी सोनाली योगेश शिंदे (वय ३२) हे दोघे बुडालेल्या अवस्थेत आढळून आले.

घटनेची माहिती मिळताच लासलगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे व पोलीस उपनिरीक्षक किरण साळुंखे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. ग्रामस्थांच्या मदतीने दोन्ही मृतदेह विहिरीबाहेर काढून रुग्णवाहिकेद्वारे लासलगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल राठोड यांनी तपासणीअंती दोघांनाही मृत घोषित केले.

या प्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू रजिस्टर क्रमांक ६३/२०२५ भारतीय नागरी सुरक्षा संहिता कायदा कलम १९४ नुसार नोंद करण्यात आली आहे. सदर घटना घातपात आहे की आत्महत्या, याबाबत तर्कवितर्क लावले जात असून लासलगाव पोलीस पुढील तपास करीत आहेत.

एकाच वेळी पती-पत्नीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने व त्यांच्या पश्चात तीन लहान अपत्ये अनाथ झाल्याने परिसरात तीव्र शोककळा पसरली आहे.

# नववर्ष स्वागताच्या निमित्ताने पनवेलमध्ये श्री भगवती साई संस्थानच्या वतीने पालखी सोहळा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** नववर्ष स्वागताच्या निमित्ताने व मंदिराच्या ४३ वा वर्धापन दिनानिमित्त पनवेलमध्ये श्री भगवती साई संस्थानच्या वतीने पालखी सोहळा आज झाला.ही पालखी मिरवणूक आज सकाळी श्री साईबाबा मंदिरातून काढण्यात आली. या पालखी सोहळ्यात रथामध्ये बसलेले श्री साईबाबा त्याचप्रमाणे श्री नारायण बाबा यांच्या मुर्त्या स्थापित करण्यात आला होत्या. हा सोहळा पनवेल रेल्वे स्थानक, पनवेल बस स्थानक, लाईन आळी, छत्रपती शिवाजी महाराज अश्वारुढ पुतळा, सोसायटीमार्गे पुन्हा श्री साईबाबा मंदिर अशी वाजत



गाजत ओम साईच्या गजरात काढण्यात आली. यावेळी मोफत आरोग्य शिबिराचे तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. याचा लाभ शेकडो जणांनी घेतला. या मिरवणुकीत श्री नारायण बाबा चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष खेमचंद गोपलाणी, सेक्रेटरी रामलाल चौधरी, राम थडानी, डॉ शकुंतला भटिजा तसेच श्री साईबाबा नारायणचे भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# ग्रामीण भागातील 20 महिलांना बचत गटांना उमेद अभियानाच्या माध्यमातून 82 लाखाचे बँकेचे कर्ज वाटप

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी डॉ. देवेंद्र ओव्हाळ / खेड पुणे :** दिनांक 31/12/2025 रोजी खेड तालुक्यातील ग्रामपंचायत वाळद येथे नायफड वाशेरे जि. प. गटातील 20 महिला बचत गटांना बँक ऑफ महाराष्ट्र वाडा यांचेकडून 12 लाख,HDFC बँक यांचेकडून 18 लाख 50 हजार,PDC-CB बँक यांच्याकडून 25 लाख 50 हजार, सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांचे कडून 26 लाख असे एकूण 82 लाख रुपयांचे कर्ज वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी पंचायत समिती खेड चे गटविकास अधिकारी मा. विशाल शिंदे साहेब यांच्या हस्ते बँक कर्ज वाटप करण्यात आले.मा. गट विकास




अधिकारी यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले सर्व गटांना आर्थिक स्वावलंबनासाठी कर्जाचा योग्य व नियोजनबद्ध वापर करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी पंचायत समिती खेड मधील पंचायत विस्तार अधिकारी श्री. मोरे सर , तालुका अभियान व्यवस्थापक देशपांडे सर, तालुका व्यवस्थापक भालेराव मॅडम, वाळद सरपंच मनोहर पोखरकर, व ग्रामपंचायत सदस्य ,ग्रामविकास अधिकारी, तालुका समन्वयक शिवाजी तेलंगे, ग्रामसखी CRP, लिपिका , BC सखी व बचत गटातील महिला उपस्थित होत्या.

# नवीन वर्षाचं पनवेलकरांकडून उत्साहात स्वागत; कोणतीही घटना अनुचित घटना नाही

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** नववर्षाच्या स्वागतासाठी नवी मुंबई शहरात पोलिसांकडून कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. नवी मुंबई आणि पनवेल परिसरात एकूण 2,500 पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते तसेच फार्म हाऊसवर होणाऱ्या पार्ट्यांवर विशेष लक्ष ठेवण्यात आले होते त्यामुळे पनवेलकरांनी नवीन वर्षाचं स्वागत करताना कोणतीही



घटना घडली नाही अशी माहिती नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी दिली.

शांतताप्रिय असलेल्या पनवेल शहरात या नवीन वर्षाचं स्वागत शांततेत तसेच कायद्याच्या चौकटीत व्हावं यासाठी पोलीस अधिकारी वा कर्मचाऱ्यांचा फौज फाटा नवी मुंबई पोलिसांनी उतरवला होता. याअनुषंगाने नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी नवी मुंबई आणि पनवेल परिसरात विविध ठिकाणी भेट देत सुरक्षेचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले कि, ड्रिंक अँड ड्राइव्ह, ओव्हरस्पीडिंग, बेकायदेशीर रेव्ह पार्टी आणि ड्रग्स विक्रीवर पोलिसांची करडी नजर राहणार आहे.

तसेच शहरातील विविध ठिकाणी नाकाबंदी उभारण्यात आली असून, हॉटेल, रेस्टॉरंट आणि क्लब रात्री 4 वाजेपर्यंत सुरू ठेवण्यास परवानगी देण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात आले असल्याची माहिती नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी दिली.

# शौर्य मेडिकलचे भव्य उद्घाटन संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी शिवाजी लोंढे/पुर्णा (जि. परभणी) :** सिद्धार्थ नगर, पुर्णा येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या "शौर्य मेडिकल" या वैद्यकीय दुकानाचे उद्घाटन शुक्रवार दि. 02 जानेवारी 2026 रोजी दुपारी 3 वाजता उत्साहात पार पडले. "आपल्या सेवेत... आमचे नवीन..." या ब्रीदवाक्यासह शौर्य मेडिकलच्या माध्यमातून नागरिकांना दर्जेदार औषधे व तत्पर सेवा देण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

या उद्घाटन सोहळ्यास भिवलू पंय्यवंश यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून नितीन (बंटी) लक्ष्मणराव कदम, मा. प्रकाश दादा कांबळे, मा. उत्तम मुगाची खंदारे, मिलिंद दादा कांबळे (महाराष्ट्र पोलीस), अनिल दादा खरखराटे, देवराव दादा खंदारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटनावेळी उपस्थित मान्यवरांनी शौर्य मेडिकलच्या उपक्रमाचे कौतुक करत नागरिकांना गुणवत्तापूर्ण औषधे, योग्य मार्गदर्शन व विश्वासार्ह सेवा मिळाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भगवान शंकर सोनकांबळे, दिनेश शंकर सोनकांबळे, सुजल भगवान सोनकांबळे, नामदेव संतराम मगरे व सुमेध संतराम मगरे यांनी विशेष परिश्रम घेतले.शौर्य मेडिकल सुरू झाल्याने सिद्धार्थ नगर व परिसरातील नागरिकांना आरोग्यविषयक सुविधा अधिक सुलभपणे उपलब्ध होणार आहेत.

# भीमा कोरेगाव विजय स्तंभ शौर्य दिनानिमित्त मुदखेड येथे अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**मुदखेड (प्रतिनिधी) /योगेश चौदंते :** भीमा कोरेगाव विजय स्तंभ शौर्य दिनाच्या निमित्ताने भारतीय बौद्ध महासभा, मुदखेड व समता सैनिक दल, मुदखेड यांच्या वतीने विजय स्तंभावर मान वंदना व विनम्र अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना अभिवादन करून शौर्य, स्वाभिमान व समतेच्या मूल्यांचा जागर करण्यात आला.कार्यक्रमात समता सैनिक दलाचे जवान शिस्तबद्ध गणवेशात उपस्थित होते. विजय स्तंभाजवळ पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी शहीद जवानांच्या पराक्रमास नमन केले. यावेळी भारतीय संविधान, समता, बंधुता व सामाजिक न्यायाच्या विचारांचे



स्मरण करून समाजात सलोखा व शांतता राखण्याचा संदेश देण्यात आला.या कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दल, मुदखेडचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम शांततेत व उत्साहात पार पडला.

# पनवेल बांधकाम व्यवसायिकांनी मनपाच्या सुचनांचे पुर्णत: पालन करावे अन्यथा कठोर कारवाई करणार : आयुक्त मंगेश चितळे

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** पनवेल मनपा हद्दीतील बांधकाम व्यावसायिकांसाठी महा नगरपालिकेने दिलेल्या सुचनांचे पुर्णत: पालन करावे अन्यथा महा नगरपालिकेच्यावतीने कठोर कारवाई करणार असल्याचे आयुक्त मंगेश चितळे यांनी केले. पनवेल मनपा कार्यक्षेत्रात बांधकामांच्या ठिकाणी धूळ प्रदूषणामुळे



नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी मनपा क्षेत्रातील बांधकाम व्यवसायिकांची महापालिका मुख्यालयात बैठक घेण्यात आली यावेळी आयुक्त बोलत होते. याबैठकिस अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, सहाय्यक नगररचनाकार केशव शिंदे, उपायुक्त स्वरूप खारगे,रचना सहाय्यक अनिकेत दुर्गावळे, मुख्य आरेखक नितीन हुद्दार उपस्थित होते.

वायु प्रदूषण नियंत्रणासाठी उच्च न्यायालयाने दिलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक काटेकोरपणे राबविण्यावर महापालिका भर देत आहे. हवा प्रदूषण , स्वच्छता ,सुरक्षा व्यवस्था या संदर्भात महापालिका कार्यक्षेत्रातील बांधकाम विकासकांनी योग्य ती काळजी घ्यावी, यासाठीच्या उपाय योजना विहीत काळात केले नाही तर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट सूचना या बैठकित आयुक्तांनी दिल्या.

यावेळी बांधकाम क्षेत्राशी निगडीत क्रिडाई, एमसीएचआय, बीएनएएम संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.यावेळी महाराष्ट्र प्रदूषण मंडळ व एमआयडीसीचे अधिकारी अनुपस्थितीत होते. याबाबत आयुक्तांनी नाराजी व्यक्त केली.

# राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून कळंबोलीत पिता- पुत्र रिंगणात

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून कळंबोली प्रभाग क्रमांक आठ मध्ये सतीश पाटील आणि एडवोकेट तुषार पाटील हे पिता पुत्र रिंगणात उतरले आहेत. त्यांच्या विरोधात महायुतीचे उमेदवार उभे आहेत.तब्बल तीन ते चार वर्षानंतर पनवेल महानगरपालिकेची निवडणूक होत आहे. यापूर्वी



पालिकेचा कारभार प्रशासक पाहत होते. मात्र 15 जानेवारी रोजी होत असलेल्या निवडणुकीनंतर पालिकेचा कारभार नगरसेवक पाहणार आहेत. त्यामुळे अनेकांना नगरसेवक होण्याचे स्वप्न पडू लागले आहेत. अनेक उमेदवार महायुती आणि महाविकास आघाडीकडे नवखे आहेत. त्यातच कळंबोली प्रभाग क्रमांक आठ मध्ये शरद पवार गटाकडून पिता-पुत्र सतीश पाटील आणि ॲड तुषार पाटील हे महायुती विरोधात निवडणूक लढवत आहेत. 30 डिसेंबर रोजी या दोघांनीही आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. या दोघांचे उमेदवारी अर्ज 31 डिसेंबर रोजी वैध ठरले आहेत. कळंबोलीतील समस्या, पाणी, कचरा प्रश्न हे मुद्दे घेऊन ते निवडणूक लढवत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. तसेच सत्ताधार्यांना या निवडणुकीत पराभूत करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सतीश पाटील यापूर्वीच्या निवडणुकीत नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत तर त्यांचे पुत्र एड. तुषार पाटील हे पहिल्यांदाच निवडणूक लढवत आहेत. त्यामुळे मतदार त्यांना कौल देतात का हे 16 जानेवारी रोजी समजणार आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# अड्याळ येथे मुख्यमंत्री पंचायतराज ग्राम समृद्धी योजना व स्वच्छ भारत अभियानांतर्गत ग्राम जयंती महोत्सव 17 सप्टेंबर ते 31 डिसेंबर कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे** : भंडारा- पवनी तालुक्यातील अड्याळ ग्रामपंचायत अंतर्गत श्री गुरुदेव सेवा मंडळ कार्यालय च्या प्रांगणामध्ये दिनांक 31 डिसेंबर 2025 रोज बुधवार ला सकाळी १०.३०वाजता पासून कार्यक्रमाला सुरुवात झाली. ग्रामपंचायत कार्यालय तर्फे मुख्यमंत्री पंचायतराज ग्राम समृद्धी 17 सप्टेंबर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिवसापासून, 2 ऑक्टोबर गांधी जयंती, ६ डिसेंबर डॉ विश्वरत्न ,बोधिसत्व,बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिन ,तसेच २० डिसेंबर वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा पुण्यतिथी, दिनांक 30 नोव्हेंबर ते 31 डिसेंबर ग्राम जयंती महोत्सव निमित्त गावात स्वच्छता अभियान, वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्यात आले. दिनांक 31 डिसेंबर 2025 ला घेण्यात आलेल्या कार्यक्रमाचे अध्यक्ष अड्याळ येथील सरपंच शिवशंकर मुंगाटे होते .तर प्रमुख अतिथी अड्याळ जिल्हा परिषद क्षेत्राच्या सदस्या सौ सुवर्णाताई शिवशंकर मुंगाटे, गुरुदेव सेवा मंडळ अध्यक्ष प्रदीप आंबीलकर, श्री सत्यसाई सेवाभावी संस्थेच्या संस्थापक सुनील पोटवर ,ओम शांती सेवा केंद्राच्या इन्चार्ज ब्रह्माकुमारी मीरा दिदी ,प्रेस संपादक व प्रे पत्रकार सेवा संघाचे महाराष्ट्र राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे ,पत्रकार पत्रकार नितीन वरगंटीवार, पंकज वानखेडे, कनिष्ठ म प्राचार्य बावणे सर, सुजाता कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ भारती घावडे उमेद महिला केदार प्रमुख सौ ताराबाई कुंभलकर, ग्रामविकास अधिकारी कुमारी पौर्णिमा साखरे ,ग्राम तंटामुक्त समिती अध्यक्ष तथा माजी सरपंच मुनेश्वर बोदलकर ,ग्रामपंचायत सदस्य आशिक अंबादे ग्रामपंचायत सदस्य सोहेल खान, ग्रामपंचायत सदस्या वसुश्री टेंभुर्णे ,ग्रामपंचायत सदस्य नम्रता मडकवार, ग्रामपंचायत सदस्य मनोरमा मडावी ग्रामपंचायत सदस्य मीनाताई निकोडे ,ग्रामपंचायत सदस्य शिल्पाताई गभणे, भाजीपाले मॅडम ,देशमुख मॅडम , मुख्याध्यापक रामरतन मोहरले, प्राध्यापक बादल केवट , मिलिंद भिमकर, विद्यालय सहाय्यक शिक्षक गौतम जनबंधू ,सर हे होते. सर्वप्रथम सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत महापुरुषांच्या प्रतिमेचे विश्वरत्न




बाबासाहेबआंबेडकर ,राष्ट्रपिता महात्मा गांधी,राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा ,यांच्या प्रतिमेला दीप प्रज्वलन करून माल्यार्पण आले .त्यानंतर उपस्थित सर्व अतिथी मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले .त्यानंतर उपस्थित अतिथींनी सदर अभियानाबद्दल ग्रामस्थांना मोलाचे मार्गदर्शन केले. आणि ग्रामस्थांना स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. ग्रामविकास अधिकारी पौर्णिमा साखरे मॅडम यांनी शासनाच्या योजना ,कर वसुली बाबत मार्गदर्शन केले. सरपंच शिवशंकर जी मुंगाटे यांनी मागील तीन महिन्यापासून राबविण्यात आलेल्या स्वच्छता अभियान बद्दल मुलाचे मार्गदर्शन केले .सदर अभियानात सर्व ग्रामपंचायत कर्मचारी, गुरुदेव सेवा मंडळ ,सर्व शैक्षणिक संस्था ,सर्व आशा वर्कर, पोलीस स्टेशन कर्मचारी ,होमगार्ड पथक ,अंगणवाडी सेविका, श्री सत्य साई समिती, ग्राम तंटामुक्त समिती उमेशच्या सर्व महिला महिला बचत गट महिला भगिनी ,ओम शांती सेवाभावी संस्था आणि गावातील सर्व सन्माननीय ग्रामवासी यांनी मागील तीन महिन्यातील पंधरा शनिवार सकाळी 8 ते सकाळी 10 वाजता पर्यंत स्वच्छता अभियान व जनजागृती अभियान राबवला .कार्यक्रमाचे संचालन तंटामुक्त समितीचे अध्यक्ष मुनेश्वर बोदलकर यांनी केले .सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्वच्छता अभियानात सेवानिवृत्त ग्राम विकास अधिकारी हिरालाजी खंडाईत, भगवान करंजकर ,दिलीप काटेखाये ,पुरुषोत्तम कुंभारे, विजय कोहपरे, प्यारेलाल कुडमते ,नामदेव भुरे ,जागेश्वर वंजारी, सुधाकर मुलकलवार ,प्रशांत पोटवार ,शरद काटेखाये ,विकास टेंभुर्णे, अमोल थुलकर, रामाजी न्यायमूर्ती,, दिनेश ढवळे, पवन वंजारी, गणेश लांजेवार , मधुकर देशपांडे,ग्रामपंचायत सदस्य विपण टेंभुर्णे ,अमोल थुलकर, रामाजी न्यायमूर्ती दिनेश ढवळे ,पवन वंजारी ,गणेश लांजेवार, मधुकर देशपांडे , विकास टेंभुर्णे,शैलेश जांभुळकर , गजानन नखाते,रणजीत लोखंडे संजय फुलबांधे ,राजीव फुलबांधे, कृष्णा मुंगाटे , स्मिता अंबादे, कल्पनाताई साठवणे , वैशाली देशमुख, वैशालीताई देशमुख, वर्षाताई रामटेके ,सविता ढवळे ,यशोदा बोरकुटे, मंदाताई गिरडकर ,लक्ष्मीताई कुंभारे , सुधा वंजारी, भावना टेकाम ,उषा काटखाये, सौ मीनाक्षी फुलवंदे ,लता खोब्रागडे, कल्पना करंजेकर,कांता गडकर ,प्रमिला तिवाडे ,समिता कासारे, अनिता जांभुळकर ,सुलोचना मेश्राम, यांनी मोलाचे सहकार्य केले. या सर्वांचे सरपंच शिवशंकर मुंगाटे यांनी केलेल्या श्रमदानाबद्दल आणि सहकार्याबद्दल ग्रामपंचायत ग्राम स्वच्छता अभियान राबविल्याबद्दल सर्वांचे सर्व उपस्थित पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या सन्मानित केले. आणि त्यांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीत आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीताने झाले. त्यानंतर सर्वांनी अल्पोपहार लाभ घेतला. उपस्थित सर्व गावकऱ्यांचे सरपंच शिवशंकर मुंगाटे यांनी आभार मानले.

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती पेण शाखा आयोजित “द दुधाचा: द नव्हेच दारूचा!” कार्यक्रम मोठया उत्साहात संपन्न..!

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी. भोईर खारपाडा -** पेण/३१ डिसेंबर/अजय शिवकर/ महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती पेण शाखा आयोजित “द दुधाचा: द नव्हेच दारूचा!” कार्यक्रम खारपाडा गावातील हनुमान मंदिर येथे ३१ डिसेंबर २०२५ रोजी मोठया उत्साहात संपन्न झाला.

नववर्षाच्या स्वागतासाठी एक सकारात्मक व समाजपयोगी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सर्व नागरिकांसाठी मोफत दूध वाटप करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते कोंकणरत्न पत्रकार कैलासराजे घरत यांनी या कार्यक्रमाचे अतिशय सुरेख सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाचे उद्घाटन अंनिसचे पेण तालुका अध्यक्ष नितीन निकम सर, ग्रूप ग्रामपंचायत दुष्मी खारपाडा सरपंच सौ नेत्रा महेंद्र घरत यांच्या शुभहस्ते दिप प्रज्वलन करून छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अंनिसचे रायगड जिल्हा कार्याध्यक्ष श्री.संदेश लक्ष्मण गायकवाड सर, निवृत्त केंद्र प्रमुख एन.जे. पाटील कार्याध्यक्ष पेण, जगदीश दिनकर डंगर-प्रधान सचिव, अनिसचे कार्यकर्ते प्राचार्य सतीश पोरे सर, आदेश पाटील, राजरत्न लोखंडे, चाईल्ड केअर सामाजिक संस्थेचे रायगड जिल्हा सहसचिव श्री सचिन



किसन गावंड, जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या माधुरीताई घरत, पत्रकार अजय शिवकर, माजी उपसरपंच परशुराम गोविंद घरत, प्रमुख वक्ते आणि मार्गदर्शक डॉ.अरिफ दाखवे आदी मान्यवर उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांचे गुलाब पुष्प आणि मोटिवेशनल पुस्तकं देऊन स्वागत करण्यात आले. शब्दश्री विलास देवळेकर रचित कवितेचे वाचन पत्रकार कैलासराजे घरत यांनी केले.

गावाच्या सामाजिक शैक्षणिक व नैतिक विकासासाठी तसेच ग्रामहितासाठी केलेल्या उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्याबद्दल पत्रकार कैलासराजे निर्मला कमलाकर घरत, अभिनेता देवदत्त घरत,

रायगड भूषण संतोष ठाकूर, मानव मित्र दल देविदास पाटील, प्रा.अंकुश ठाकूर, विवेक घरत यांना “आदर्श ग्रामस्थ पुरस्कार -२०२५” देऊन सन्मानित करण्यात आले. आपले कार्य इतर ग्रामस्थांसाठी सदैव प्रेरणादायी ठरो हीच शुभेच्छा.

सर्व प्रमुख मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यातून तरुणाईसाठी विशेष संदेश देण्याचा प्रयत्न केला गेला..

तरुणांनी व्यसनाच्या आहारी जाऊ नये, निरोगी, निर्व्यसनी व सशक्त जीवनशैलीचा स्वीकार करावा, व्यसनातून बाहेर पडण्यासाठी स्वतःची तयारी हवी. त्यासाठी समुपदेशन करणे आवश्यक आहे.

यावेळी युवा कार्यकर्ते महेंद्रदादा घरत, संतोष ठाकूर, मालती संतोष ठाकूर, भरत घरत, रणजीत पाटील, चंद्रकांत घरत, मनोज पाटील, महेंद्र मोरे, ॲड.जयेश देसले, महादेव घरत, हिरामण घरत, दर्शन घरत, माजी अध्यक्ष चंद्रकांत पाटील, सदस्य अशोक पाटील,

हितेश घरत, गौरव घरत, आदित्य घरत, कैलास रुठे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

सर्वांचे आभार मानूनराष्ट्रगीताने या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने चालणारा, एक नवी आशा, एक नवी दिशा देणारा आणि तरुणाईला एक आदर्श दीपस्तंभ ठरेल. रमाकांत घरत यांच्या रूपाने पुरोगामी विचारांचे, सामाजिक चळवळीचा वारसा जोपासणारे एक सक्षम युवा नेतृत्व खारपाडा गावाला लाभले आहे त्याबद्दल त्याचे कौतुक करावे तेवढे कमीच.

या कार्यक्रमाचे खारपाडा पंचक्रोशीतील नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे.

# भोंगा वाजला की अंभोरा गावातील विद्यार्थी करतात दोन तास अभ्यास

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंभोरा शाळेचा नाविन्यपूर्ण उपक्रम

**दैनिक आधार**

**आष्टी प्रतिनिधी/ बाळासाहेब रकटाटे /अंभोरा (ता. आष्टी):**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अंभोरा गावात एक अभिनव व अनुकरणीय उपक्रम राबविण्यात येत आहे. सायंकाळी ठराविक वेळी भोंगा वाजताच गावातील विद्यार्थी टीव्ही, मोबाईल, खेळ व इतर व्यत्यय बाजूला ठेवून किमान दोन तास नियमित अभ्यासासाठी बसतात. “भोंगा वाजला की अभ्यास सुरू” हा संदेश आता अंभोराची ओळख बनत आहे.

हा उपक्रम जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंभोरा, ग्रामपंचायत व शाळा व्यवस्थापन समितीच्या संयुक्त पुढाकारातून सुरू करण्यात आला आहे. भोंगा वाजल्यानंतर संपूर्ण गावात अभ्यासासाठी अनुकूल व



शांत वातावरण निर्माण होते. घराघरांतून वही-पुस्तकांचा आवाज, वाचन व लेखनाची लगबग दिसून येते. परिणामी विद्यार्थ्यांमध्ये नियमित अभ्यासाची सवय लागली असून त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा होत आहे.

या उपक्रमाला पालकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. “भोंगा वाजल्यानंतर मुलांनी अभ्यास करणे ही आता रोजची शिस्त झाली आहे. आम्हीही मोबाईल-टीव्ही मर्यादित ठेवून मुलांना अभ्यासासाठी प्रोत्साहन देतो,” अशी भावना पालक व्यक्त करीत आहेत. काही पालक स्वतःही मुलांसोबत बसून धडे समजावून सांगत असल्याने घरगुती अभ्याससंस्कृतीला चालना मिळत आहे.

शिक्षकवर्गाच्या मते, या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, वेळेचे नियोजन, एकाग्रता व आत्मविश्वास वाढत आहे. नियमित अभ्यासामुळे वाचनगती, लेखनसुस्पष्टता व गणिती कौशल्ये सुधारत असून परीक्षेतील कामगिरीतही सकारात्मक बदल दिसून येत आहे. डिजिटल व्यसनांपासून दूर राहण्याची सवय लागणे हा या उपक्रमाचा मोठा फायदा असल्याचेही शिक्षक सांगतात.

ग्रामपंचायत व शाळा व्यवस्थापन समितीच्या समन्वयामुळे उपक्रम अधिक प्रभावी ठरत आहे. वेळोवेळी पालकसभा, मार्गदर्शन शिबिरे व विद्यार्थ्यांसाठी प्रोत्साहनात्मक उपक्रम राबवून अभ्यासाची गोडी वाढविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. गावकऱ्यांचा सक्रिय सहभाग लाभल्याने हा उपक्रम सामाजिक चळवळीचे स्वरूप घेत आहे.

विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरत असलेला हा उपक्रम इतर गावांसाठीही प्रेरणादायी आहे. कमी खर्चात, लोकसहभागातून शिक्षणाचा दर्जा उंचावण्याचे हे अंभोराचे यशस्वी मॉडेल म्हणून ओळखले जात आहे.

## जिल्हा परिषद कन्या शाळेच्या सुरक्षेसाठी मराठा प्रतिष्ठानचा पुढाकार

### सोयगाव येथे सीसीटीव्ही कॅमेरा भेट

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे** : मराठा प्रतिष्ठान सोयगाव तसेच प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सोपान दादा गव्हाडे ,पाटील यांच्या वतीने जिल्हा परिषद कन्या शाळेस शाळा व विद्यार्थी सुरक्षेसाठी मोठा सीसीटीव्ही कॅमेरा भेट देण्यात आला.

या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रवी काळे, नगरपंचायतचे नगरसेवक कदीही शहा व बंटी भाऊ काळे,ॲड.योगेश पाटील,शहरातील व्यापारी प्रमोद रावणे तसेच मराठा प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष विजय काळे उपस्थित होते.मराठा प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष विजय काळे यांच्या माध्यमातून हा कॅमेरा जिल्हा परिषद कन्या



शाळेस प्रदान करण्यात आला. या उपक्रमामुळे शाळेतील विद्यार्थिनींची तसेच शाळेच्या परिसराची सुरक्षितता अधिक बळकट होणार असून पालकांमध्येही समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

मराठा प्रतिष्ठानच्या या सामाजिक उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून,भविष्यातही शिक्षण व सुरक्षेसाठी असेच उपक्रम राबविण्यात येतील,असे यावेळी सांगण्यात आले.

“आजच्या काळात शाळा व विद्यार्थिनींची सुरक्षितता ही सर्वांत महत्त्वाची बाब आहे. जिल्हा परिषद कन्या शाळेतील मुली निर्भय वातावरणात शिक्षण घेऊ शकाव्यात, या उद्देशाने मराठा प्रतिष्ठानच्या वतीने सीसीटीव्ही कॅमेरा भेट देण्यात आला आहे.

शिक्षणासोबतच सुरक्षा व्यवस्थेला बळकटी देणे हीच खरी सामाजिक जबाबदारी असून, भविष्यातही मराठा प्रतिष्ठान अशाच उपक्रमांद्वारे समाजहिताचे कार्य करत राहील,” असे प्रतिपादन मराठा प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष विजय काळे यांनी केले.

## पंढरीनाथ तामोरे यांची घुमतोय वादळवारा, झंझावात, आदर्शाचे प्रकाशदिप ही पुस्तके सामाजिक आणि भौगोलिक माहिती देणारी - जेष्ठ संपादक दिनकर गांगल

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी / गुरुनाथ तिरपणकर :** सध्या आपल्या सर्वांच्या संवेदना हरविलेल्या आहेत, याही परिस्थितीत साहित्याचार्य पंढरीनाथ तामोरे यांची घुमतोय वादळवारा, झंझावात, आदर्शाचे प्रकाशदिप तीनही पुस्तके सामाजिक आणि भौगोलिक माहिती देणारी असून पुढील पिढ्याकरिता मार्गदर्शक असून ती बारकाईने वाचली गेल्यास लक्षात येईल असे जेष्ठ पत्रकार थिंक महाराष्ट्र डॉट कॉमचे संपादक दिनकर गांगल यांनी रविवारी दि.२८ डिसेंबर रोजी दादर येथील प्रा. सुरेंद्र गावस्कर सभागृह मुंबई ग्रंथ संग्रहालय येथे पुस्तक प्रकाशन प्रसंगी अध्यक्षस्थानावरून बोलताना सांगितले. सुरूवात सरस्वती पूजन जेष्ठ पत्रकार दिनकर गांगल, जेष्ठ कवी अरुण म्हात्रे, अभिनेत्री लेखिका



मेघना साने, जेष्ठ पत्रकार रविप्रकाश कुळकर्णी, श्रीकांत आंब्रे, आजचा तटरक्षक संपादक प्रविण ना. दवणे, सौ. नलिनी तामोरे याच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. जेष्ठ संपादक दिनकर गांगल पुढे म्हणाले की,अरूण पेदे वेसावकर यांच्यासह कोळी आविष्कार जीवन चित्रण आज प्रत्यक्ष पाहत असताना यामध्ये खऱ्याअर्थाने चैतन्याचा खजिना सोबत आज प्रकाशित झालेल्या पुस्तका इतकाच असून यातून लालित्य पूर्ण समाज संस्कृती निर्माण करण्यात आल्याचे श्री. गांगल यांनी नमूद केले. जेष्ठ कवी अरुण म्हात्रे यांनी सांगितले की, पंढरीनाथ तामोरे म्हणजे समाजाला दिशा देणारा आणि समाजाबद्दल जाणीव असणारा लेखक असल्याने त्यांची प्रमाण भाषा असून ती कोळी समाजाला आपली भाषा असल्याचे अधोरेखित होते. मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झालेला असताना एकाच वेळी तीन पुस्तके प्रकाशित होणे हीच तामोरे याच्या लिखाणातील ताकद असल्याचे विषद केले. यावेळी अभिनेत्री लेखिका मेघना साने यांनी एका पुस्तकाचे परिक्षण करुन इतर पुस्तके सुध्दा तेवढ्याच ताकदीची वाचनीय असल्याचे सांगितले. जेष्ठ पत्रकार रविप्रकाश कुळकर्णी, श्रीकांत आंब्रे, आजचा तटरक्षक संपादक प्रविण ना दवणे, सौ. प्रज्ञा तामोरे आदींनी मनोगत व्यक्त करून शुभेच्छा व्यक्त केल्या. प्रारंभी प्रास्ताविक राजेंद्र मेहेर माजी सरचिटणीस अखिल भारतीय मांगेला समाज परिषद यांनी केले. नुत्य कलाकार अरूण पेदे वेसावकर यांचा सत्कार जेष्ठ पत्रकार दिनकर गांगल यांच्या हस्ते करण्यात आला. उपस्थित पाहुण्यांचा सत्कार लेखक पंढरीनाथ तामोरे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्प करंडक प्रदान करून करण्यात आला. प्रकाशन सोहळ्याचे सूत्रसंचालन भक्तीसंगम मासिकाचे कार्यकारी संपादक प्रा. हेमंत सामंत आणि दर्याचा राजा सहसंपादक प्रमोद कांदळगावकर यांनी संयुक्तपणे अतिशय सुबक शब्दात केले. तर श्रीमती सुजाता एकनाथ पागधरे यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी मोठ्या संख्येने साहित्यप्रेमी उपस्थित होते.

# जि. प.अध्यक्ष चषक स्पर्धेत वांगण सुळे शाळेचे घवघवीत यश

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा :** दि. ३१/१२/२०२५ रोजी सुरगाणा तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा आमदा (प.) येथे जि. प.अध्यक्ष चषक केंद्रस्तरीय सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जि. प.शाळा वांगण सुळे शाळेने घवघवीत यश संपादन केले.





या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये वैयक्तिक नृत्य, गीतगायन, रनिंग, वक्तृत्व स्पर्धा, मॅथ बी, खोखो, चित्रकला अशा क्रिडा प्रकारांचा समावेश होता.केंद्रातील विविध शाळांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. स्पर्धा अत्यंत चुरशीची झाल्या असून प्रत्येक संघाने आपले कौशल्ये दाखवले.स्पर्धेत नृत्य, गीतगायन, रनिंग, वक्तृत्व, खोखो या क्रिडा प्रकारात आपल्या शाळेचे नाव उंचावत घवघवीत यश संपादन केले.या विद्यार्थ्यांच्या यशात शाळेतील सर्व शिक्षक वृंद व पालकांचे मोलाचे सहकार्य लाभले. केंद्रातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक, सर्व सहकारी शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच परिसरातून सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन होत आहे.

# तुकाराम बारामते यांना गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** भैरवनाथ विद्यालय, सालेवडगाव येथील सहशिक्षक तुकाराम बारामते यांना त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. शिक्षण क्षेत्रात अतिशय कमी कालावधीत उल्लेखनीय योगदान दिल्या बद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. मूळचे धामनगाव ता.अकोले जि.अहिल्यानगर येथील शिक्षक तुकाराम बारामते हे अतिशय प्रतिकूल परिस्थितल्या कुटुंबातील सदस्य असून



शिक्षणामुळे आपण सर्व अडचणीवर व संकटावर मात करू शकतो हे मनाशी ठरवून इंग्रजी विषयात पदवी मिळवली व बी एड केले. पहिल्याच प्रयत्नात त्यांना लोकमान्य शिक्षण संस्थेच्या भैरवनाथ विद्यालयात नोकरी मिळाली. मिळालेल्या संधीचे सोने करत त्यांनी इंग्रजी विषयाचे अत्यंत उत्कृष्ट अध्यापन करत अनेक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची प्रेरणा दिली. त्यांचे इंग्रजी विषयावरील प्रभुत्व व विद्यार्थ्यांशी समरूप होण्याच्या प्रवृत्ती मुळे अत्यंत कमी कालावधीत त्यांचे शैक्षणिक काम परिसरात, संस्थेत तसेच तालुक्यात सर्वदूर पोहोचले. त्यांच्या या कार्याची दखल घेत शेतकरी शिक्षण संस्थेच्या रौप्य महोत्सव निमित्त वितरित होणाऱ्या शिक्षण क्षेत्रातील राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी त्यांची निवड केली. बुधवार दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी आष्टी येथे त्यांना माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या हस्ते पुरस्कार प्रधान करण्यात आला. या वेळी पत्नी सुवर्णा तुकाराम बारामते, मुलगी प्रणिती तुकाराम बारामते सह आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल लोकमान्य शिक्षण संस्थेचे सचिव एडवोकेट हनुमंत रावजी थोरवे साहेब, युवा नेते धैर्यशील थोरवे साहेब तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक बापू गाडे सर, सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, सालेवडगावचे सरपंच महेश कराळे, उपसरपंच सिदु हजारे, माजी सरपंच महादेव डोके तसेच समस्त ग्रामस्थ सालेवडगाव, मित्र परिवार, नातेवाईक, आप्तेष्ट, हितचिंतक यांनी बारामते सर यांचे अभिनंदन करत पुढील शैक्षणिक कार्यास व वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# स्वागत 2026 या नवीन वर्षाचे आपल्या संकल्प आणि ध्येयपूर्ती साठीचे

नमस्कार मंडळी 2025 या सालातून आपण 2026 या नवीन सालामध्ये अत्यंत उत्साहाने आनंदाने जल्लोषाने स्वागत करून पाऊल ठेवले आहे . यानिमित्ताने आपण विविध संकल्प सुद्धा हाती घेतले असाल तर त्याबद्दल तुमचे मनापासून अभिनंदन ! मंडळी संकल्प असे असावे की ते अमलात आणल्यानंतर आपला आर्थिक सामाजिक आणि शारीरिक अशा प्रकारचा विकास होणं अपेक्षित आहे नाही का ? आरोग्यासाठी संकल्प : रोज सकाळी कमीत कमी 20 ते 30 मिनिटे चालणे, योगासन, किंवा हलके व्यायाम करणे.बाहेरचे जंक फूड कमी करून घरचं पौष्टिक अन्न




खाण्यावर भर देणे. पुरेशी झोप म्हणजे कमीत कमी सात ते आठ तास शांत झोप घेण्याचा प्रयत्न करणे. पाण्याचे प्रमाण दिवसभरात तीन ते चार लिटर पाणी पिणे. मानसिक शांती आणि वैयक्तिक विकासासाठी वाचन करणे. एखादा संकल्प केल्यानंतर तो अमलात आणत असताना एकदम बदल करून घेऊ नका उदाहरणार्थ : शारीरिक बदल घडवत असताना एकदम एक तासाचा व्यायाम चालू न करता रोज सुरुवातीला 15 ते 20 मिनिटं आणि नंतर वेळ वाढवत वाढवत दिवसेंदिवस एक तास व्यायामाच्या टारगेट तुम्ही सहज साधू शकाल , तसेच मानसिक विकासासाठी : काही वाचन करत असताना रोज थोडं थोडं वाचून हळूहळू वाचनाचा टाईम वाढवत गेल्यास कंटाळा न येता त्याच्यात रुची उत्पन्न होईल, हीच गोष्ट आर्थिक विकासाच्या बाबतीत गुंतवणूक करीत असताना आपल्या उत्पन्नाचा अंदाज घेऊन थोडी थोडी इन्व्हेस्टमेंट हळूहळू मोठी कशी करता येईल याचा अंदाज घेऊन गुंतवणूक केल्याचा आनंद किंवा समाधान मिळवणं फार महत्त्वाच आहे अशा प्रकारचा संकल्प आणि त्याची पूर्तता करण्यासाठी यावर्षी तुम्हाला नक्की यश लाभाव अशी दैनिक युवक आधारच्या माध्यमातून आपणास समृद्ध आणि भरभराटीच्याआयुष्यासाठी शुभेच्छा देतो.

# देवा दत्ता' च्या गजरात दुमदूमली डोळबा नगरी ;गावातून निघाली भव्य मिरवणूक

**दैनिक युवक आधार**

**उमेश साखरकर दिग्रस प्रतिनिधी :** तालुक्यातील शेवटच्या टोकावर असणाऱ्या डोळंबा गावात नववर्षानिमित्त बालब्रह्मचारी नारायणगिरी महाराज यांचा सोळस महापूजेचा कार्यक्रम दत्त सांप्रदाय मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. त्यानिमित्ताने गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली या मिरवणुकीत गावातील लहान मोठ्यांनी उत्फूर्त सहभागी होत महिलांनी देवा दत्ताच्या भजनावर तल्लीन होत लेझीम थिरकावली या मिरवकीत दत्त नामाच्या गजरात गावकरी तल्लीन झाले होते.


ब्रमचारी नारायण गिरी महाराज यांच्या मिरवणूक सोहळा गावातील सुरवातीपासून मिरवणूक सोहळ्याला प्रारंभ झाला. विविध



समाजातील भक्तांनी व गावातील महिलांनी लेझीम घेऊन या पालखी सोहळ्यात सहभागी झाले होते. या सोहळ्यानिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.पालखी मिरवणुकीनिमित्त महिलांनी गावातील मुख्य रस्त्यावर सडा रांगोळीने सजावट केली होती. दरम्यान, या भव्य मिरवणुकीची सांगता हनुमान मंदिरा जवळ करण्यात आली.

# सोशल मीडियाचा वापर: धोकादायक स्थिती

आजच्या परिस्थितीत सोशल मीडिया किंवा मोबाईल मानवी शरीरावर स्लोपॉयझनचे काम करीत असुन घणाघाती प्रहार करीत आहे व संपूर्ण दिनचर्येवर अंकुश लावत आहे.आज लहानांपासून तर मोठ्यांपर्यंत सर्रास सोशल मीडियाचा वाजवीपेक्षा जास्त वापर होतांना दिसत आहे.यामुळे लहान मुलांचे बालपण हिरावण्याचे मोबाईलसह सोशल मीडिया करीत आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे. जिथे गरज नाही तीथेही सोशल मीडियाचा वापर दिसून येतो.आज फक्त ऑस्ट्रेलिया, स्वीडनमध्येच नाही तर संपूर्ण जगात टिव्ही आणि मोबाईलच्या अती वापरामुळे म्हणजेच सोशल मीडियामुळे दुष्परिणामाला सुरूवात झाली आहे.कारण टीव्ही आणि मोबाइलने लहान मुलांसह संपूर्ण मानवजातीला कौटुंबिक नाते तोडून आपलेसे करून ठेवले आहेत. यामुळे लहान मुलांचे बालपण हिरावले आहे. टिव्हि आणि मोबाइलचा दुष्परिणाम लहान मुलांवर मोठ्या प्रमाणात होऊन पुढील आयुष्यासाठी धोका निर्माण करण्याचे चिन्ह स्पष्ट दिसत आहे.कारण यामुळे अनेक नवीन -नवीन आजार जन्म घेऊ शकतात आणि घेत आहे.आधुनिक काळात लहान मुले रडायला लागली की आई-वडिल त्यांच्या हातात मोबाईल देऊन त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला जातो आणि ही प्रथा जगातील अनेक देशांमध्ये आहे.याचा दुष्परिणाम स्वीडनमध्ये व ऑस्ट्रेलियामध्ये दिसायला लागला आहे. त्यामुळे आता स्वीडनमध्ये दोन वर्षांखालील मुलांना मोबाइल, टीव्ही पाहण्यास बंदी घालण्यात आली आहे.तर ऑस्ट्रेलियामध्ये १६ वर्षांखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घालण्यात आली आहे.एका पाहणीनुसार १३ ते १६ वयोगटातील स्वीडिश किशोरवयीन मुले शाळेबाहेर पडल्यानंतर दररोज सरासरी साडेसहा तास मोबाइल, टीव्हीवर घालवत आहेत.८ तासांपेक्षा जास्त वेळ स्क्रीनवर अमेरिकेतील किशोरवयीन मुले घालवत आहेत. हीबाब भविष्यासाठी अत्यंत घातक आहे.देशांच्या आरोग्य संस्थेच्या मते मोबाईल आणि टिव्ही स्क्रीनचा वापर शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम करीत असल्याने लहान मुलांना डिजिटल मिडिया आणि टेलिव्हिजन पासुन पूर्णपणे दुर ठेवले पाहिजे. मोबाईल, टीव्हीच्या अतिवापरामुळे कौटुंबिक संवाद आणि शारीरिक व्यायाम बंद झाले आहे.आपण म्हणतो "बालपण देगा देवा!"परंतु आज आपले बालपण मोबाईल आणि टिव्हीने हिरावून घेतले आहे ही अत्यंत चिंताजनक आणि घातक बाब आहे. स्मार्टफोन दिवसेंदिवस छोट्या-छोट्या बालकांसाठी व युवावर्गासाठी घातक सिद्ध होत.त्याचप्रमाणे शाळांमध्ये व ऑनलाईन शिक्षणप्रणालीमध्ये विद्यार्थीवर्ग मोबाईलचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहे व यांचे दुष्परिणाम हळूहळू सामोरं येतांना दिसत आहे.एक वर्षांवरील मुलं रडतात म्हणून आई-वडील मुलांच्या हातात मोबाईल देवुन आपली सुटका करून घेतात.याचेही दुष्परिणाम हळूहळू समोर येतांना दिसत आहे.याचेच प्रायश्चित्त आज स्वीडिश व ऑस्ट्रेलियन किशोरवयीन मुले भोगत आहेत.ही परिस्थिती फक्त स्वीडनमध्ये किंवा ऑस्ट्रेलियामध्येच नाही तर भारतासह संपूर्ण जगात आपल्याला पहायला मिळते. यामुळे जगातील संपूर्ण शाळांनी मोबाईलवर बंदी आणावी असा सुचक सल्ला युनेस्कोने सुध्दा दिला आहे. देशासह जगात डिजिटल क्रांती झाली अवश्य परंतु त्याचा गैरवापर विद्यार्थ्यांच्या व युवकांच्या अंगाशी येतांना दिसत आहे. सोबतच बालवयात आई-वडील मुलांना मोबाइलच्या आहारी टाकतांना दिसतात.स्मार्टफोनमुळे सामाजिक, व्यवहारीक व इतर क्षेत्रात आमूलाग्र बदल झाल्याचे आपल्याला दिसुन येते. आज मोबाईलच्या अतिवापरामुळे कोणीही कोणासोबत समक्ष बोलायला तयार नाही,घरात सर्वसाधारण चर्चा करायला तयार नाही, कोणत्याही गोष्टीची बोलण्यातून देवाणघेवाण किंवा आदानप्रदान होत नाही.कारण एक वर्षांच्या मुलांपासून ते मोठ्या पर्यंत सर्वच घंटोनघंटे मोबाईलमध्ये व्यस्त असतात. पालक आपल्या जबाबदारीपासुन पळ काढण्यासाठी व अतिलाडामुळे चिमुकले सुध्दा मोबाईलच्या व टिव्हीच्या आहारी गेले आहेत.यामुळे मानसिक आजार वाढण्याची दाट शक्यता आहे आणि वाढत आहे. मोबाईलच्या गेममध्ये युवावर्ग



दिवसेंदिवस फसतांना दिसत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे भारतात युवावर्ग मोठ्या प्रमाणात मोबाईलच्या आदिन झालेले आहेत. यामुळे त्यांना अनेक व्याधींचा सामना करावा लागतो आहे. शिक्षण क्षेत्रातील डिजिटल क्रांती विद्यार्थांसाठी चिंताजनक असल्याचे मत युनेस्कोच्या अहवालातून समोर आले आहे.मोबाईलचा अतिरिक्त वापर झाल्याने शैक्षणिक कामगिरी मंदावते.स्क्रीन टाईम वाढल्याने मुलांच्या भावनिक स्थिरतेवर नकारात्मक परिणाम होतो.परिणामी,मुले चिडचिडे व रागीट बनतात असेही युनेस्कोने म्हटले आहे.यामुळे मुलांमधील फिजिकल ॲक्टिविटी दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात कमी-कमी होतांना दिसत आहे हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.देशात ७४ टक्के मुले (११ ते १७ वयोगटातील) रोज ३० मिनीटेही मैदानी खेळ खेळत नाही.त्याचप्रमाणे १६ ते ३४ वयोगटातील ५९ टक्के लोक ऑनलाईन खेळ ३-३ तास खेळण्यात मग्न असतात.म्हणजेच आजची युवा पिढी मोबाईलच्या खेळांमध्ये (गेममध्ये) मोठ्या प्रमाणात मग्न असल्याचे स्पष्ट दिसून येते.यामुळे शरीराला आवश्यकतेनुसार पाहिजे तेवढा व्यायाम मिळत नाही.डब्लुएचओच्या रिपोर्ट नुसार भारतात ११ ते १७ वयोगटातील ७४ टक्के मुले फिजीकल ॲक्टिव्ह नसल्याचे सांगितले जात आहे.म्हणजेच एका आठवड्यात मुलं १५० मिनिटसुध्दा खेळत नाही किंवा शारीरिक हालचाली ज्या पध्दतीने पाहिजेत त्या पध्दतीने दिसून येत नाही.यावरून स्पष्ट होते की आजचा विद्यार्थीवर्ग व युवावर्ग दिवसेंदिवस डोक्यानी कीतीही हुशार असेल परंतु शारीरिक दृष्ट्या खालावत असल्याचे दिसून येते. देशातील ४५ टक्के लोक मोबाईलच्या नादामुळे शारीरिक व्यायामाच्या दृष्टीकोनातून ॲक्टिव नसल्याचे दिसून येते.म्हणजे आज बालपणापासुन तर युवा वर्गापर्यंत आणि युवावर्गापासुन तर वयस्कर लोकांना सुद्धा मोबाईलने चांगलेच जखडल्याचे आपण पहातो.यामुळे शरिराला ज्या पध्दतीने आणि ज्याप्रमाणात व्यायामाची आवश्यकता आणि गरज आहे तो मिळत नसल्याने अनेक व्याधी किंवा आजार बालकांमध्ये, युवावर्गामध्ये व अन्य लोकांमध्ये दिसून येते व यांचा आरोग्यावर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होत आहे.आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात मोबाईल शिवाय जिवन अधुरे असल्याचे सर्वांना वाटते. परंतु मोबाईलचा अती वापर दिवसेंदिवस मानवाच्या दृष्टीकोनातून घातक सिद्ध होत आहे हेही तितकेच सत्य आहे याला कोणीही नाकारू शकत नाही. म्हणजेच मोबाईलचा अती वापर जीव घेणा सीध्द होवू शकते यालाही नाकारता येत नाही.मानवाच्या मेंदूला (मस्तिष्कला) रक्तपुरवठा व्यवस्थित आणि सुरळीत झाला नाही तर (स्ट्रोक) होण्याचे मोठे कारण ठरू शकते.स्ट्रोक म्हणजे पॅरालिसीसचा ॲटॅक अथवा लकवा किंवा ब्रेन ॲटॅक असेही म्हणतात.देशात स्ट्रोकच्या आजाराचे जवळपास ६५ लाख रूग्ण असल्याचे सांगितले जाते.म्हणजेच आजच्या घडीला मोबाईलच्या अती वापरामुळे मानवजाती अत्यंत धोकादायक स्थितीत आल्याचे समजते.ही बाब स्पष्ट होते की मोबाईलच्या अती वापरामुळे लठ्ठपणा, शुगर (मधुमेह), डोळ्यांचा आजार ,मानेचा त्रास, मेंदूचा त्रास,हार्टच्या आजारासह अनेक आजार मानवाच्या शरिरात घर करीत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे शरीरातील प्रत्येक अवयवांना पाहिजे त्याप्रमाणात व्यायाम मिळतच नाही. त्यामुळे ही कठीण परिस्थिती उध्दभवत आहे.मानवाला मोबाईलमुळे व टिव्हीमुळे जेवढा आनंद मिळतो त्यापेक्षा जास्त धोका आणि गंभीर परिणाम मोबाईल व टिव्हीच्या स्क्रीनमुळे होणाऱ्या आजारामुळे निर्माण होत आहे.त्यामुळे मोबाईलचा वापर कमीत कमी कसा करता येईल व आपल्याला शारीरिक दृष्ट्या कोणताही धोका निर्माण होणार नाही यापध्दतीने मोबाईलचा वापर व्हायला हवा."अमेरिकन ॲकेडमी ऑफ पीडियाट्रिक्स या संस्थेने एका संशोधनात म्हटले आहे की दोन ते चार वर्षांच्या मुलांनी दिवसातून फार तर एक तास फोन वापरणे योग्य असल्याचे संशोधनात म्हटले आहे.चार वर्षांपेक्षा जास्त वयाच्या मुलांनी दररोज दोन तास मोबाईल वापरणे योग्य आहे.यापेक्षा जास्त मोबाईल वापरल्यास डोळ्यासोबतच मानसिक आरोग्यावरही विपरीत परिणाम होतो यानंतर यांचे भयंकर परिणाम भोगावे लागू शकतात.आपण काय करायचं आणि काय करू नये हे आपणच ठरवू शकतो व धोकादायक वस्तू पासून दुर राहु शकतो.आज आपण पहातो की ३ ते २० वर्षे वयोगटातील मुले-मुली टीव्ही पहाताना, जेवतांना मोबाईलला चीपकुन रहातात. जनुकाय मोबाईल बीना जिवन अधुरे आहे की काय अशी परिस्थिती दिसून येते.याचा दुष्परिणाम पुढेचालुन भयानक होवू शकतो.छोटे मुलं रडायला लागले की आई- वडिल त्यांच्या हातात मोबाईल देऊन मोकळे होतात परंतु हे घातक आहे.त्यामुळे पालकांना आग्रहाची विनंती करतो की मुलांना मोबाइल पासून जितके दुर ठेवता येईल तितके दुर ठेवलेच पाहिजे. यामुळे मुलांना फिजिकल ॲक्टीव्हीटी किंवा व्यायाम करण्यास मदत होईल.मोबाईलचा अती वापर शरिराला घातक आहेच त्याचबरोबर त्याचा गैरवापर केला तर जीवाला सुध्दा धोका निर्माण होऊ शकतो आणि होत आहे. आजही लोक वाहन चालवितांणा मोबाईलवर बोलत रहातात यामुळे अनेक दुर्घटना झाल्याचे आपण पहातो आणि यामुळे देशात मोठ्या प्रमाणात जीवीत हाणी सुध्दा झाल्या आहेत. मोबाइल वापरायला हरकत नाही.परंतु त्याचा योग्यवेळी आणि कमीत कमी वापर व्हायला पाहिजे.अन्याथा मोबाईलमुळे जेवढे सुख आणि आनंद मिळतो.त्यापेक्षा हजार पटीने आपल्याला यातना किंवा दु:ख भोगाव्या लागतील हेही तितकेच सत्य आहे. त्यामुळे मुलांनी मोबाईल हातात घेण्यापेक्षा पुस्तक, वर्तमानपत्र हातात घेतले तर बुध्दीचा विकास झपाट्याने होईल व पुस्तकी ज्ञानामुळे शरिराच्या विकासाला मोठी चालना मिळेल. आपण एकंदरीत विचार केला तर मोबाईल युगामुळे देशातील मातीतील छोटे-छोटे खेळ नामशेष झाले आहे किंवा होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे अनेक आजारांचा सामना आज करावा लागतो आहे.आजच्या युवापिढीला जुने खेळ काय होते ते सुद्धा माहिती नाही आणि या संपूर्ण गोष्टी सोशल मीडियामुळे उध्दभवतांना दिसते. म्हणजेच आजचे मोबाईल व सोशल मीडियाचे युग बालकांसाठी,युवा वर्गासाठी किंवा विद्यार्थांना शारीरीक दृष्ट्या अपंग करीत असल्याचे दिसून येते.यावरून असे लक्षात येते की वर्चुअल खेळांमुळे रियल खेळ हळूहळू नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.आज मोबाईलची दुनिया पहाता असे वाटते "कहा गये ओ दिन"स्वीडन ऑस्ट्रेलियामध्ये मोबाईल आणि टिव्हीचे लहान मुलांवर होत असलेले दुष्परिणाम पहाता स्वीडन सरकारने काही मार्गदर्शक तत्वे जाहीर केली आहेत.यावरून स्पष्ट होते की टीव्ही आणि मोबाइलने स्वीडनमध्ये भयावह रूप धारण केले आहे.त्यामुळे यापासून भारत सरकारने व देशातील संपूर्ण जनतेनी सावधगिरी बाळगली पाहिजे. ऑनलाइन बाल लैंगिक शोषणाशी संबंधित साहित्य असणारे यूआरएल अद्यापही सक्रिय आहेत हे रोखण्यासाठी सरकारने कठोर पाऊले उचलुन तातडीने नियंत्रण आणणे गरजेचे आहे.भारतात वाढता सोशल मीडियाचा वापर पहाता सरकारने ऑस्ट्रेलिया व स्वीडन सारखे कठोर नियमांची अंमलबजावणी केली पाहिजे.

**- रमेश कृष्णराव लांजेवार**

# अजिंठा, वेरुळसारख्या जागतिक दर्जाच्या पर्यटनस्थळांकडं पर्यटकांची पाठ, स्थानिक प्रशासन आहे जबाबदार?

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :**
जागतिक पातळीवर भारतात येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत कुठं वाढ झाली, तर कुठं घट झाल्याची माहिती भारतीय पर्यटन विभागानं जारी केली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पर्यटन स्थळांवर भारतीय पर्यटकांच्या संख्येत घट झाली आहे, तर विदेशी पर्यटकांच्या संख्येत म्हणावी तशी वाढ झाली नसल्याचं अहवालातून समोर आलंय. यावर्षी पर्यटन व्यवसायाला गती मिळाली नसल्याची खंत पर्यटन व्यावसायिकांनी व्यक्त केली. विशेषतः विदेशात भारतातील पर्यटनस्थळांची जाहिरात होत नसल्याने परिणाम होतोय. शिवाय हॉटेलचे निश्चित नसलेले दर यामुळं देशी- विदेशी पर्यटकांवर परिणाम होत असल्याची खंत पर्यटन व्यावसायिक जसवंत सिंग यांनी व्यक्त केली.

भारतीय पर्यटन विभागानं जाहीर केली आकडेवारी - भारतीय पर्यटन विभागानं दोन वर्षात देशी - विदेशी पर्यटकांची आकडेवारी जाहीर केली. त्यामुळं जिल्ह्यातील अजिंठा, वेरूळ लेणी, देवगिरी किल्ला, औरंगाबाद लेणी, बीबी का मकबरा या पर्यटनस्थळांवर येणाऱ्या देशी पर्यटकांच्या संख्येत काही प्रमाणात घट झाल्याची माहिती देण्यात आली. विदेशी पर्यटकांच्या संख्येत देखील म्हणावी तशी वाढ झाली नसल्याचं दिसून येत आहे.



**अहवालात आलेल्या माहितीनुसार**

अजिंठा लेणी : २०२३-२४ मध्ये ४ लाख ५२ हजार १८२ देशी पर्यटक, तर १८ हजार ८२९ विदेशी पर्यटकांनी भेट दिली होती. २०२४-२०२५ मध्ये ४ लाख ४२ हजार ०६५ देशी पर्यटकांनी आणि २० हजार ८५५ विदेशी पर्यटकांनी भेट दिली होती.

वेरूळ लेणी : २०२३-२४ मध्ये १७ लाख ४० हजार ५१३ देशी पर्यटक, तर १९ हजार ६४३ विदेशी पर्यटकांनी वेरुळ लेणीला भेट दिली. २०२४-२०२५ मध्ये १७ लाख ३९ हजार ८७३ देशी पर्यटकांनी आणि २० हजार ७१० विदेशी पर्यटकांनी भेट दिली होती.

बीबी का मकबरा : २०२३-२४ मध्ये १२ लाख ९५ हजार ०७६ देशी पर्यटक, तर ९ हजार ६०६ विदेशी पर्यटकांनी भेट दिली. २०२४-२०२५ मध्ये २० लाख ४ हजार ५३५ देशी पर्यटकांनी आणि १० हजार ६१२ विदेशी पर्यटकांनी भेट दिली होती.



देवगिरी किल्ला : २०२३-२४ मध्ये ५ लाख ४७ हजार ५६९ देशी पर्यटक, तर ३ हजार ८०९ विदेशी पर्यटकांनी देवगिरी किल्ल्याला भेट दिली होती. २०२४-२५ मध्ये ५ लाख ४५ हजार ६३५ देशी पर्यटकांनी आणि ४ हजार ३२ विदेशी पर्यटकांनी भेट दिली होती.

औरंगाबाद लेणी : २०२३-२४ मध्ये १ लाख ३२ हजार ५१८ देशी पर्यटक, तर १ हजार ४९५ विदेशी पर्यटकांनी औरंगाबाद लेणीला भेट दिली. २०२४-२५ मध्ये १ लाख २६ हजार ३२७ देशी पर्यटकांनी आणि १ हजार ६०९ विदेशी पर्यटकांनी भेट दिली होती.

**पर्यटनावर परिणाम कशामुळं होतोय? -** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पर्यटनस्थळांवर येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येवर परिणाम झालाय. त्याला काही कारणं असल्याची माहिती व्यावसायिक जसवंत सिंग यांनी दिली. "विदेशात असणारी पर्यटन ऑफिस बंद झाल्याने तिकडं होणारी मार्केटिंग कमी झाली. पर्यटनासाठी दूतावासात एक अधिकारी नेमण्यात येईल, असं सांगण्यात आलं होतं. मात्र, तसं झालं नाही त्यामुळं विदेशी पर्यटकांच्या संख्येवर परिणाम झाला. काही वर्षांपूर्वी हॉटेल व्यावसायिकांचे वर्षभराचे दर निश्चित राहायचे. मात्र, आता त्यात अनिश्चिती आली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा विचार केला तर विमानसेवा विस्कळीत आहे, सोयीसुविधांचा अभाव असल्याने काही प्रमाणात परिणाम झालाय. मकबरा येथे स्थानिक लोक अधिक जात असल्याने तिथे संख्या काही प्रमाणात अधिक आहे," अशी माहिती व्यावसायिक तसंच 'औरंगाबाद टुरिझम डेव्हलपमेंट फाऊंडेशन'चे अध्यक्ष जसवंत सिंग यांनी दिली. त्याचबरोबर पर्यटन वाढीसाठी राज्य सरकार आणि केंद्र सरकारनं प्रयत्न करणे गरजेचं असल्याचं त्यांनी सांगितलं.

**स्थानिक पातळीवर बदलाची गरज -** "विदेशी पर्यटकांसाठी अनेक अडचणी आहेत. त्यांच्यासाठी वेगळी तिकीट व्यवस्था नाही. माहिती देण्यासाठी पर्यटनस्थळांवर योग्य व्यक्ती नसतात. शहरात येण्यासाठी रेल्वेची उपलब्धता म्हणावी तशी नाहीय. विमानाची अनियमितता, वेरूळ- अजिंठासाठी बसची सुविधा नाही. खासगी गाड्यांचे दर परवडत नाहीत, अशा अनेक समस्या असल्याने याचा परिणाम पर्यटनावर होत असल्याची खंत 'गाईड वेल्फेअर असोसिएशन'चे अध्यक्ष भरत जोशी यांनी व्यक्त केली. योग्य माहिती सांगणारे गाईड दिल्यास पर्यटक वाढतील. एसटी महामंडळाच्या एसी बस आधी चालू होत्या.

मात्र, त्या बंद झाल्या आहेत. त्या पुन्हा सुरू कराव्यात. आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटनस्थळ असल्याने मराठीसह इंग्रजीमध्ये माहिती फलक लावणे गरजेचं आहे. पर्यटनस्थळांचा प्रचार कमी पडतो. त्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे," अशी माहिती गाईड वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष भरत जोशी यांनी दिली.

## माथेरानमध्ये नववर्षाच्या स्वागताप्रसंगी शुकशुकाट; पावसाने हजेरी लावल्याने व्यावसायिकांचे नुकसान

**दैनिक युवक आधार**
**माथेरान, प्रतिनिधी :** यावर्षी थर्टी फर्स्ट बुधवार या कामकाजाच्या मधल्या दिवशी आल्याने, त्यातच एकादशी असल्यामुळे कोणतीही सलग सुट्टी न मिळाल्याने निसर्गरम्य माथेरानमध्ये सर्वत्र शुकशुकाट पाहायला मिळाला. त्यातच पावसाने हजेरी लावल्याने पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात घटल्याचे चित्र पहावयास मिळाले. थंडगार व आल्हाददायक वातावरण असूनही अपेक्षित पर्यटक न आल्याने व्यावसायिकांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी पसरली आहे.




थर्टी फर्स्ट हा दिवस उत्साह, गर्दी आणि व्यवसाय वाढवणारा मानला जातो. मात्र यंदा हा दिवस कामकाजाच्या मधोमध आल्याने अनेक पर्यटकांनी बाहेरगावी जाणे टाळले. विशेष म्हणजे बदलापूर, शेलू, नेरळ, भिवपुरी, कर्जत आदी परिसरात मोठ्या प्रमाणावर उभारलेल्या फॉर्महाऊसकडे पर्यटकांचा कल वाढल्याचे चित्र दिसून आले. सर्व सुखसोयी असलेली आकर्षक पॅकेजेस, तसेच अनेक ठिकाणी नियमांची सक्ती नसल्यामुळे पर्यटकांनी माथेरानपेक्षा फॉर्महाऊसना प्राधान्य दिल्याचे व्यावसायिकांचे म्हणणे आहे. पर्यटनावर अवलंबून असलेले माथेरानमधील हॉटेल व्यावसायिक, लॉज चालक, घोडेवाले, हातगाडीवाले, दुकानदार व छोटे व्यावसायिक सलग सुट्ट्या आणि पीक सीझनकडे मोठ्या आशेने पाहत असतात. मात्र यंदा थर्टी फर्स्ट बुधवारी आल्याने ही अपेक्षा फोल ठरली. बुधवार हा खास खवय्यांसाठी महत्त्वाचा दिवस मानला जात असला, तरी कामकाजाचा दिवस असल्याने पर्यटकांची पावले माथेरानकडे वळली नाहीत.

आज माथेरानमधील रस्ते, बाजारपेठा आणि पर्यटनस्थळे ओस पडलेली दिसत असून नेहमीची गर्दी पूर्णपणे गायब झाली आहे. अनेक व्यावसायिकांनी या कालावधीसाठी मोठ्या प्रमाणावर तयारी व मालसाठा केला होता. मात्र पर्यटकांनी पाठ फिरवल्याने त्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत असल्याची भावना व्यक्त होत आहे. संपूर्ण शहरात शांततेचे वातावरण असून नागरिकांमध्ये नाराजी दिसून येत आहे. एकूणच, यंदाचा थर्टी फर्स्ट माथेरानसाठी आनंदाचा न ठरता गारठवणारा ठरला असून, पर्यटनावर अवलंबून असलेल्या या शहराला सलग सुट्ट्या आणि योग्य पर्यटन नियोजनाची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

## बंगालमधील घुसखोरी संपवणार!; अमित शहा यांचा निर्धार

**दैनिक युवक आधार**
**नवी दिल्ली, प्रतिनिधी :** पश्चिम बंगाल गेल्या १५ वर्षांत भीती, भ्रष्टाचार आणि घुसखोरीचा बळी ठरला आहे. २०२६ मध्ये भाजपचे सरकार आल्यास आम्ही ही घुसखोरी संपवणार. प्रत्येक घुसखोराला शोधून बाहेर काढू. विकासाला गती दिली जाईल आणि बंगालचा सांस्कृतिक वारसा पुनरुज्जीवित केला जाईल, असा निर्धार केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी येथे व्यक्त केला. पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर असलेल्या शहा यांनी कोलकातात पत्रकार परिषद घेऊन तृणमूल काँग्रेस (टीएमसी) सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. गृहमंत्री म्हणाले की, बंगालच्या सीमेवरून होणारी घुसखोरी हा



केवळ राज्याचाच नाही, तर संपूर्ण देशाच्या सुरक्षेशी संबंधित विषय आहे. देशाची संस्कृती आणि सुरक्षा वाचवण्यासाठी बंगालच्या सीमा सील करणारे सरकार आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. हे काम टीएमसी करू शकत नाही, तर केवळ भाजपच करू शकते, असेही ते म्हणाले. गेल्या १५ वर्षांपासून भीती आणि भ्रष्टाचार ही बंगालची ओळख बनली आहे. १५ एप्रिल २०२६ नंतर जेव्हा बंगालमध्ये भाजपचे सरकार येईल, तेव्हा आम्ही 'बंग गौरव', 'बंग संस्कृती' आणि त्याच्या पुनर्जागरणाची सुरुवात करू. विवेकानंद, बंकिम बाबू, गुरुदेव टागोर आणि श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या स्वप्नातील बंगाल घडवण्याचा आमचा प्रयत्न असेल, असे शहा म्हणाले. 'टीएमसी'च्या १५ वर्षांच्या राजवटीत भ्रष्टाचार, कुशासन आणि विशेषतः घुसखोरीमुळे बंगालची जनता भयभीत आणि साशंक आहे. आम्ही बंगालच्या जनतेला आश्वासन आणि वचन देतो की, मोदीजींच्या नेतृत्वाखाली भाजपचे सरकार येताच येथील वारसा पुनरुज्जीवित करू, विकासाची गंगा पुन्हा वेगाने वाहेल आणि गरीब कल्याणाला आमचे प्राधान्य असेल, असे आश्वासन गृहमंत्र्यांनी दिले.

## अभाविप पश्चिम प्रांताचे शनिवार पासून अधिवेशन

**दैनिक युवक आधार**
**नाशिक, सचिन कदम :**
अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे हीरक महोत्सवी प्रदेश अधिवेशन तीन ते पाच जानेवारी या कालावधीत येथील डोंगरे वसतिगृह मैदानावर होणार आहे. या अधिवेशनात संपूर्ण पश्चिम महाराष्ट्र प्रांतातील परिषद रचनेतील २३ म्हणजेच शासकीय सात जिल्ह्यांमधून एक हजारपेक्षा अधिक कार्यकर्ते सहभागी होणार आहेत.

अधिवेशनाचे उद्घाटन तीन जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. अधिवेशनानिमित्त रवींद्र सहस्त्रबुद्धे प्रदर्शनी उभारण्यात येणार असून, त्यातून अभाविपचा वर्षभरातील रचनात्मक उपक्रम आणि आंदोलनांचा प्रवास कार्यकर्त्यांना पाहता येणार आहे. या तीन दिवसीय अधिवेशनात विविध वैचारिक सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये "विश्वगुरू भारतासाठी युवांचे योगदान" या विषयावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे क्षेत्र प्रचारक सुमंत आमशेकर, "संविधान-७५" या विषयावर ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल केतकर आणि "स्वबोध" या विषयावर अभाविपचे पश्चिम क्षेत्र संघटन मंत्री गीतेश चव्हाण यांचे मार्गदर्शन होणार आहे. तसेच, महाराष्ट्रातील शैक्षणिक व सामाजिक स्थिती आणि नाशिकच्या शाश्वत विकासावर आधारित चार महत्त्वपूर्ण प्रस्ताव या अधिवेशनात संमत केले जातील.

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी, चार जानेवारी रोजी दुपारी नाशिक शहराच्या मध्यवर्ती भागातून शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या शोभायात्रेत पश्चिम महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांच्या संस्कृतीचे दर्शन घडणार असून, मॅरेथॉन चौकातील जाहीर सभेने या यात्रेचा समारोप होईल. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता प्रदेशाध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. शांतीनाथ बागेवाडी आणि प्रदेश मंत्री म्हणून अथर्व कुलकर्णी यांची पुन्हा नियुक्त झाली असून, या अधिवेशनात ते अधिकृतपणे आपला पदभार स्वीकारतील.

## आष्टी,पाटोदा,शिरूर विधानसभा मतदार संघाच्या विविध प्रश्ना संदर्भात पालकमंत्री ना.अजितदादांकडे माजी आ.भीमराव धोंडे यांची आग्रही मागणी

### विहीर,रस्ते,शेततलावासह पूल बंधारे आणि इतर विकासात्मक बाबींकडे लक्ष वेधले

**दैनिक युवक आधार**
**बीड प्रतिनिधी/मारुती सत्रे :** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांची आज बीड येथे आवर्जून विशेष भेट घेत आष्टी,पाटोदा,शिरूर विधानसभा मतदारसंघातील विविध प्रश्नांच्या अनुषंगाने चर्चा केली आणि हे प्रश्न आग्रहाने सोडविण्यासाठी विनंती करण्यात आली.महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांची बीड येथे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी भेट घेऊन आष्टी,



पाटोदा,शिरूर विधानसभा मतदार संघातील अतिवृष्टीने नदीवरचे वाहून गेलेले पूल, बंधारे व शेतकऱ्यांच्या वाहून गेलेल्या जमिनीचे शासकीय नियमाप्रमाणे मिळणारे अर्थसहाय्य तातडीने देण्यात यावे असा आग्रह धरला. एमआरईजीएस अंतर्गत होणारे विहीर,रस्ते,शेततलाव आदि बंद असलेले कामे तात्काळ सुरू करावेत,असे जिल्हाधिकारी यांना आदेश देण्यात यावेत अशीही मागणीह लेखी निवेदनाद्वारे केली आहे.एकूणच आष्टी,पाटोदा,शिरूर विधानसभा मतदार संघातील सर्वसामान्य जनतेच्या अत्यंत महत्त्वाच्या समस्या आणि प्रश्नांवर विशेष भर देत हे प्रश्न मार्गी लागावेत या अनुषंगाने अजित दादाकडे माजी आ.भीमराव धोंडे यांनी विस्तृत चर्चा केली.तेव्हा उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी यासंदर्भात स्वतः लक्ष घालून ते सोडवण्यासाठी कार्यवाही करू असा सकारात्मक प्रतिसाद दिला.

**विविध प्रश्न मार्गी लागणार**

आष्टी,पाटोदा, शिरूर, विधानसभा मतदार संघातील अतिवृष्टीने नदीवरचे वाहून गेलेले पूल बंधारे शेतकऱ्यांच्या वाहून गेलेल्या जमिनी यांना शासकीय नियमानुसार मिळणारे अर्थसहाय्य तसेच एम आर ई जी एस अंतर्गत विहीर रस्त्याचे तलाव यासंदर्भात माजी आ. भीमराव धोंडे यांनी केलेल्या चर्चेनुसार उपमुख्यमंत्री यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने उत्सुकता निर्माण झाली आहे.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण,पांडुरंग नागरगोजे,उत्तम बोडखे, भागवत वारे,अनिल जायभाये ऊपस्थित होते

## सामाजिक न्याय विभागाचे महामंडळ आर्थिक अडचणीत; केंद्र शासनाकडून कर्जपुरवठ्यास नकार

**दैनिक युवक आधार**
**नागपूर प्रतिनिधी :** राज्य शासनाने महामंडळांसाठी ६०० कोटींची शासन हमी दिली असली तरी सुमारे २५० कोटींची रक्कम अद्याप प्राप्त झाली नाही. त्यामुळे दिल्लीस्थित राष्ट्रीय आर्थिक विकास महामंडळांनी पुढील निधी देण्यास नकार दिला असून सामाजिक न्याय विभागाच्या कर्ज व स्वयंरोजगार योजनांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ (एनएसएफडीसी) तसेच राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ (एनएसकेएफडीसी) या दोन महत्त्वाच्या आर्थिक विकास महामंडळांच्या माध्यमातून राज्यातील सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यरत महामंडळांना अल्प व्याजदरात कर्जपुरवठा केला जातो. एनएसएफडीसीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळास २.५ ते ४ टक्के दराने कर्ज दिले जाते, तर एनएसकेएफडीसी, नवी दिल्ली यांच्या नियमानुसार संबंधित महामंडळांना २ ते ४.५ टक्के दराने कर्जपुरवठा करण्यात येतो.

ही केंद्र शासनाची महामंडळे 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर कार्यरत असून राज्यातील अनुसूचित जाती, नवबौद्ध व सफाई कर्मचारी, समाजातील दुर्बल व वंचित घटकांच्या आर्थिक प्रगतीसाठी खेळत्या भांडवलाच्या स्वरूपात निधी उपलब्ध करून देतात. मात्र, सध्या या कर्जपुरवठ्याबाबत मोठी अडचण निर्माण झाली आहे. राज्य शासनाने या महामंडळांसाठी सुमारे ६०० कोटी रुपयांची शासन हमी दिलेली असतानाही, यापूर्वीची सुमारे २५० कोटींची थकीत रक्कम अद्याप मिळाली नाही.

या रकमेचा प्रश्न मार्गी न लागल्याने दिल्लीस्थित राष्ट्रीय आर्थिक विकास महामंडळांकडून पुढील निधी उपलब्ध करून देण्यास केंद्र शासनाने स्पष्ट नकार दिला आहे. याचा थेट परिणाम राज्यातील सामाजिक न्याय विभागाच्या विविध कर्ज योजना, स्वयंरोजगार योजना, तसेच इतर कार्यक्रमांवर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अनेक लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्रलंबित राहण्याची भीती असून, नव्या कर्जवाटपावरही मर्यादा येण्याची शक्यता आहे.

यापूर्वी सन २०१९ मध्ये पाच वर्षांसाठी शासन हमी देण्यात आली होती. ती मुदत २०२४ मध्ये संपुष्टात आल्याने पुढील पाच वर्षांसाठी नव्याने या तीनही महामंडळांना मिळून ७५० कोटींची शासन हमी देण्यात आल्याची माहिती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी भंडारा येथील आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी विचारलेल्या प्रश्नाला लेखी उत्तर देताना दिली. मात्र, थकीत रक्कम मिळेपर्यंत केंद्राकडून निधी मिळणार नसल्याने राज्य शासनाने तातडीने पाठपुरावा करावा, अशी मागणी होत आहे.

**कर्जधोरणानुसार शासन हमी आवश्यक**

राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील दुर्बल घटकांना व्यवसायासाठी अल्प व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देऊन स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ व रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळ या तीन महामंडळांची स्थापना करण्यात आली आहे. या महामंडळांना राष्ट्रीय महामंडळांकडून कर्ज मिळण्यासाठी एनएसएफडीसी व एनएसकेएफडीसी यांच्या कर्जधोरणानुसार शासन हमी देणे आवश्यक असते.